आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर
वाचा एका क्लिकवर
www.dainiklaturprabhat.in





# दैनिक लातूर प्रभात

E-mail :- laturprabhat@gmail.com

मुख्य संपादक : रघुनाथ बनसोडे मो.नं.८८३०२ ५०६४५,

RNI No.: - MAHMAR/2017/72894 ● वर्ष ८ वे ● अंक ५१ वा ● शनिवार दि. १३ जुलै २०२४ ● किंमत २ रूपया ● पाने ४ ●


## ''मला भेटायचे असेल तर आधार कार्ड बरोबर घेऊन या'', खासदार कंगना रणौतचे विधान

मुंबई : बॉलीवूड अभिनेत्री कंगना रणौत वेगवेगळ्या कारणांमुळे कायम चर्चेत असतात. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत हिमाचल प्रदेशच्या मंडी मतदारसंघातून कंगना रणौत खासदार झाल्या आहेत. अभिनेत्री ते खासदार हा त्यांचा प्रवास कायम चर्चेत राहिला. आता कंगना रणौत पुन्हा एकदा चर्चेत आल्या आहेत. खासदार झाल्यानंतर त्यांच्याकडे अनेक लोक स्वत:ची कामं घेऊन येतात. मात्र, कंगना रणौत यांनी आपल्याला भेटण्यासाठी लोकांनी आपले आधार कार्ड बरोबर घेऊन यावे, असे म्हटले आहे. त्यांच्या या विधानानंतर विरोधकांनी संताप व्यक्त केला आहे. ''हिमाचल प्रदेशच्या मंडी मतदारसंघात माझे कार्यालय आहे. प्रत्येकाने आपल्या समस्या किंवा तक्रारी कागदावर लिहून ठेवल्यास त्या ऐकणे आणि समजून घेणे सोप्प होईल. अनेकवेळा पर्यटक भेटायला येतात आणि सर्वसामान्यांची गैरसोय होते.

## विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा कारखाना येथे गाळप हंगाम २०२४- २५ साठी मिल रोलर पुजन संपन्न.

विलास नगर : विकासरत्न विलासराव देशमुख



मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखाना येथे गळीत हंगाम २०२४–२५ साठी मिल रोलरचे पुजन व्हा चेअरमन श्रीशैल उटगे यांच्या हस्ते दि.१२ जुलै २०२४ रोजी संपन्न झाले. यावेळी कारखान्याचे संचालक सर्वश्री सुर्यकांत पाटील,सचिन शिंदे, निळकंठ बचाटे (पवार), तात्यासाहेब देशमुख, अशोक काळे, नवनाथ काळे,बंकट कदम, सदाशिव कदम, अनिल दरकसे, विलास चामले, शंकर बोळंगे, बाबुराव जाधव, तज्ञ संचालक ज्ञानेश्र्वर भिसे,महेंद्रनाथ भादेकर, श्रीनिवास देशमुख, कार्यलक्षी संचालक, पंडित देसाई, कार्यकारी संचालक खाते प्रमुख उपखाते प्रमुख व कामगार आदींची उपस्थिती होती.

## फिनिक्स फाउंडेशन संस्था लोदगा आणि वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी यांच्यात सामंजस्य करार.

लातूर : राज्यामध्ये मिलेट (भरडधान्य) व



बांबू यांच्या शेतीचा प्रचार व प्रसार व्हावा आणि यावर आधारित प्रक्रिया उद्योगांच्या माध्यमातून राज्यात रोजगार निर्मिती व्हावी त्याबरोबरच मिलेट आणि बांबू यामध्ये संशोधनाचे काम वाढावे या उद्देशाने फिनिक्स फाउंडेशन आणि वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी अंतर्गत सामंजस्य करारावर स्वाक्षरी करण्यात आली.

या सामंजस्य करारामुळे बांबू शेती आणि भरडधान्यामध्ये कृषी विद्यापीठामध्ये जे नवीन शोध, तंत्रज्ञान विकसित होईल त्याचा फायदा परिसरातील आणि महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना होणार आहे.त्याबरोबरच फिनिक्स फाउंडेशन संस्थेच्या माध्यमातून शेतकरीवर्ग थेट कृषी विद्यापीठाशी जोडला जाईल आणि संस्थेमार्फत माहितीचे आदान– प्रदान, त्याबरोबरच शेतकरी आणि संस्थेच्या कृषी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना आधुनिक संशोधन आणि तंत्रज्ञानाचे दर्जेदार प्रशिक्षण सुलभपणे उपलभ होणार आहे.

बांबू आणि भरडधान्य शेती व प्रक्रिया यासाठी हा सामंजस्य करार एक मैलाचा दगड ठरणार आहे अशी आशा संस्थेचे समन्वयक परवेज पाशा पटेल यांनी व्यक्त केली. या प्रसंगी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. इंद्र मणी, संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता डॉ.श्री.यु.एम.खोडके, संचालक संशोधन डॉ. के. एस.बेग, डॉ.व्हि.एस.खंदारे, डॉ.एम.एस.पेंडके, डॉ.आवारे फिनिक्स फाउंडेशन संस्थेचे समन्वयक परवेज पाशा पटेल आदी मान्यवर उपस्थित होते.

## कांदा, कापूस, सोयाबीन संदर्भात दिलासा मिळणार

नवी दिल्ली, : कांदा, कापूस आणि सोयाबीन संदर्भात महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना लवकरच दिलासा मिळणार असल्याची माहिती राज्याच्या कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष तसेच पर्यावरण संतुलन टास्क फोर्स अध्यक्ष पाशा पटेल यांनी दिली. केंद्रीय वाणिज्य व उद्योग मंत्री पीयूष गोयल यांच्या निवासस्थानी बैठक झाली. बैठकीनंतर श्री. पटेल यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना सांगितले की, कापूस, सोयाबीन आणि कांदा पिकांच्या विषयासंदर्भात केंद्रीय पर्यावरण मंत्री भूपेंद्र यादव, रेल्वे मंत्री अश्र्विनी वैष्णव आणि वाणिज्य मंत्री श्री. गोयल यांच्यासमवेत बैठकीचे आयोजन करण्यात आले. श्री. पटेल यांनी बैठकीत कापूस, सोयाबीन आणि कांदा या पिकांसंदर्भात वस्तुस्थिती श्री. गोयल यांच्यासमोर मांडली. शेतमालाचे आयात–निर्यात धोरण व अनुषंगिक बाबी याबाबत लवकरच ठोस निर्णय घेण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले. या बैठकीमध्ये विविध मुद्द्यांवर तपशीलवार चर्चा झाली असून लवकरच शेतकऱ्यांना दिलासा मिळेल, असे श्री. पटेल यांनी सांगितले.




# शालेय विद्यार्थ्यांना टीफीन व अंध दांपत्यांसाठी संसार उपयोगी वस्तूंचे मोफत वितरण

**लातूर : समाजातील दिव्यांगाप्रती सहानुभूतीपेक्षा अनुभूतीची भावना जपत मराठवाड्यातील लातूर, बीड, धाराशिव, नांदेड, छत्रपती संभाजी नगर, जालना, परभणी आणि हिंगोली या सर्व जिल्ह्यातील अंध शालेय विद्यार्थ्यांना टिफिन तर अंध दांपत्यांना संसार उपयोगी वस्तूचे किराणा सामान वितरण नुकतेच शिवाजी हायस्कूल, लेबर कॉलनी, लातूर येथे मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. हा कार्यक्रम बीअँड विजन फाउंडेशन (बिव्हीएफ) या सामाजिक संस्थेच्या सहकार्याने संपन्न झाला.**

यावेळी प्रमुख अतिथी म्हणून महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई, लातूर महानगरपालिकेच्या माजी नगरसेविका तथा सक्रिय सामाजिक कार्यकर्त्या शितल मालू, आंबेजोगाई येथील प्रसिद्ध व्यापारी सुहासजी पाठक, सामाजिक कार्यकर्ते सुधाकर घारापूरकर, बीअँड व्हिजन फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. माधव गोरे, सचिव संदीप चोपडे, कोषाध्यक्ष मीरा चोपडे, सहसचिव प्रशांत गवंडगावे आणि संचालक दशरथ सुरवसे यांची उपस्थिती होती.

यावेळी मराठवाड्यातील लातूर, बीड, धाराशिव, नांदेड, छत्रपती संभाजी नगर, जालना, परभणी आणि हिंगोली या परिसरातील शालेय विद्यार्थी व अंध दांपत्यांसाठी शैक्षणिक मार्गदर्शन शिबिर व १०वी १२वी उत्तीर्ण शालेय विद्यार्थ्यांचा सत्कार सुद्धा





करण्यात आला.

यावेळी प्रमुख अतिथी डॉ. संजय गवई बोलताना म्हणाले की, आपण दिव्यांग व्यक्तीच्या स्वाभिमानी जीवन जगण्याचे अभिनंदन केले पाहिजे. शैक्षणिक क्षेत्रात अडचणी सोडवण्यास आपण सदैव सक्रिय राहू अशी भूमिका त्यांनी व्यक्त केली आणि विद्यार्थ्यांना शैक्षणिक मार्गदर्शन केले व यशस्वीतेसाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी शितलताई मालू म्हणाल्या की, आपण बीऑन विजन फाउंडेशन या संस्थेच्या आगामी सर्व उपक्रमात सक्रिय सहभागी होऊ अशी भावना व्यक्त केली. संस्थेच्या भावी दिव्यांगांसाठी आयोजित आयोध्या अध्यात्मिक सहल आयोजनास सक्रिय सहकार्य करू असे आश्र्वासित केले.

सुधाकर घारापूरकर यांनी व्यावसायिक मार्गदर्शन करून संस्थेच्या वाटचालीचे कौतुक केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. माधव गोरे यांनी केले सूत्रसंचालन मीरा चोपडे यांनी केले व आभार प्रदर्शन प्रशांत गवंडगावे यांनी केले

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाकरिता अमोल निलंगेकर, सुभाष चिने, दशरथ सुरवसे आणि प्रशांत गवंडगावे यांनी परिश्रम घेतले.

## चौदाव्या विधानसभा कार्यकाळात तब्बल १ हजार २९ तास १८ मिनिटे कामकाज

मुंबई, : चौदाव्या विधानसभेच्या कार्यकाळात



तब्बल १ हजार २९ तास १८ मिनिटे कामकाज झाले. रोजचे सरासरी कामकाज ७ तास ३४ मिनिटे झाले. तर एकूण बैठकांची संख्या १३६ आहे.या विधानसभेच्या कार्यकाळात विधानसभेत सदस्यांची जास्तीत जास्त उपस्थिती ९६.६५ टक्के होती, तर एकूण सरासरी उपस्थिती ही ८२.६७ टक्के इतकी होती.

विधानसभेत पुर्न:स्थापित १९७ शासकीय विधेयके मांडण्यात आली त्यापैकी १८३ विधेयके संमत झाली. तसेच सभागृहात नियम २९३ अन्वये एकूण २८ सूचनांवर चर्चा झाली. १४ वी विधानसभा दि. २५ ऑक्टोबर २०१९ रोजी गठित झाली. तर सभागृहाची पहिली बैठक दि. २७ नोव्हेंबर २०१९ रोजी घेण्यात आली.

## विधानपरिषदेच्या ११ जागांचे निकाल जाहीर

मुंबई, : भारत निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधानपरिषदेच्या ११ जागांसाठी द्वैवार्षिक निवडणूक जाहीर केली होती. महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारे निवडून दिल्या जाणाऱ्या विधानपरिषदेच्या ११ सदस्यांच्या रिक्त होणाऱ्या जागांकरिता आज १२ जुलै २०२४ रोजी मतदान व मतमोजणी करण्यात आली.

या निवडणुकीत श्रीमती पंकजा गोपीनाथराव मुंडे, योगेश कुंडलिक टिळेकर, डॉ.परिणय रमेश फुके, अमित गणपत गोरखे, डॉ. प्रज्ञा राजीव सातव, कृपाल हिराबाई बालाजी तुमाने, भावना पुंडलिकराव गवळी, शिवाजीराव यशवंत गर्जे, राजेश उत्तमराव विटेकर, सदाभाऊ रामचंद्र खोत आणि मिलिंद केशव नार्वेकर हे ११ सदस्य विजयी झाले आहेत, अशी घोषणा विधानमंडळ सचिवालयाचे सचिव तथा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ.जितेंद्र भोळे यांनी केली.

विधानपरिषद सदस्य डॉ. मनीषा श्यामसुंदर कायंदे, विजय विठ्ठल गिरकर, अब्दुल्ला खान अ.लतीफ खान दुर्राणी, नीलय मधुकर नाईक, ॲड. अनिल दत्तात्रय परब,रमेश नारायण पाटील, रामराव बालाजीराव पाटील, डॉ. वजाहत मिर्झा अथेर मिर्झा, डॉ. प्रज्ञा राजीव सातव, महादेव जगन्नाथ जानकर आणि जयंत प्रभाकर पाटील हे २७ जुलै २०२४ रोजी विधान परिषदेतून निवृत्त होत आहेत. त्यामुळे भारत निवडणूक आयोगाकडून ही निवडणूक घेण्यात आली होती.

## विकसित भारताची संकल्पना हे एक लक्ष्य नसून ते पवित्र अभियान – उपराष्ट्रपती जगदीप धनखड

मुंबई, : विकसित भारत २०४७ हे केवळ एक लक्ष्य नसून ते एक पवित्र अभियान आहे, असे उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी आज सांगितले. हे दशक भारताचे दशक आहे असे ठाम प्रतिपादन करत प्रत्येक नागरिक, प्रत्येक संस्था आणि आपल्या समाजातील प्रत्येक घटकाने या अभियानात अधिकाधिक योगदान द्यावे, असे आवाहन उपराष्ट्रपती श्री. धनखड यांनी केले. उपराष्ट्रपती श्री. धनखड यांनी आज मुंबईतील नरसी मोनजी इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज या व्यवस्थापन प्रशिक्षण संस्थेचे विद्यार्थी **(पान २ वर)....**

# लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे अर्ज स्वीकृती केंद्र सुरु

## शहरातील महिलांनी लाभ घ्यावा - आयुक्त बाबासाहेब मनोहरे

लातूर/प्रतिनिधी :शासनाच्या वतीने राज्यातील महिलांचे आरोग्य व पोषण आणि यांच्या आर्थिक स्वावलंबनासाठी विविध योजना राबविण्यात येत आहेत. त्यानुसार राज्यातील महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी, त्यांच्या आरोग्य आणि पोषणामध्ये सुधारणा करणे आणि कुटुंबातील त्यांची निर्णायक भूमिका मजबूत करण्यासाठी शासनामार्फत मुख्यमंत्री – माझी लाडकी बहीण योजना सुरू करण्यात आलेली आहे.

या योजनेचा लाभ शहरातील पुढीलप्रमाणे पात्रता निकष पूर्ण करणाऱ्या महिलांना अर्ज करता येतो. यात महाराष्ट्र राज्यातील २१ ते ६५ वर्षे वयोगटातील विवाहित, विधवा, घटस्फोटीत, परित्यक्त्या आणि निराधार महिला तसेच त्या कुटुंबातील केवळ एक अविवाहित मुलगी, यासाठी त्या महिलेचे आधार कार्ड, महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र आवश्यक आहे ते नसल्यास त्या ऐवजी त्या महिलेचे १५ वर्षापूर्वीचे रेशन कार्ड, मतदान ओळखपत्र, शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र व जन्म दाखला या पैकी कोणतेही एक कागदपत्र, उत्पन्न प्रमाणपत्र किंवा रेशन कार्ड, बँक खातेचे पास बुक व एक पासपोर्ट फोटो अर्ज भरण्यासाठी आवश्यक आहेत. ज्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न २ लक्ष ५० हजार पेक्षा जास्त आहे अशा कुटुंबातील महिला पात्र असणार नाहीत.

योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महानगरपालिका क्षेत्रात अर्ज स्वीकृती केंद्र स्थापन करण्यात आली आहेत या केंद्रावर कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. त्याची यादी पुढीलप्रमाणे शहरातील क्षेत्रीय कार्यालय ए मध्ये काशी महादेव मंदिर विशालनगर, मारोती मंदिर सूळ नगर, नागरी आरोग्य केंद्र सुभेदार रामजी नगर, पाण्याची टाकी बार्शी रोड, बौद्धविहार विक्रमनगर, बालाजी मंदिर हडको कॉलनी, मनपा शाळा क्र. २४ विकास नगर, बौद्धविहार न्यू भाग्य नगर, कुलस्वामिनी मंदिर कुलस्वामिनी नगर, नालंदा बौद्धविहार प्रकाश नगर, वाले इंग्लिश स्कूल खाडगाव रोड, मनपा मंगल कार्यालय खणी भाग, पाण्याची टाकी सरस्वती कॉलनी, राधा कृष्ण मंदिर दादोजी कोंडदेव नगर, क्षेत्रीय कार्यालय बी मध्ये दक्षिणमुखी हनुमान मंदिर लमाण तांडा, क्षेत्रीय कार्यालय बी ठाकरे चौक, विठ्ठल रुक्मिणी मंदिर कन्हेरी रोड, लाल बहादूर शाळा जुना औसा रोड, श्री श्री रविशंकर शाळा गोपाळ नगर, राजनंदिनी शाळा गोपाळ नगर, विठ्ठल रुक्मिणी मंदिर माताजी नगर, राम मंदिर पटेलनगर, मिनार उर्दू स्कूल हनुमान मंदिर नंदनवन कॉलनी, विठ्ठल रुक्मिणी मंदिर मजगे नगर, क्षेत्रीय कार्यालय सी मध्ये सिद्धार्थ समाजमंदिर संजयनगर, साहित्य सम्राट अण्णा भाऊ साठे सभागृह राजीवनगर, बौद्धविहार समाजमंदिर इंदिरानगर, बौद्धविहार आनंदनगर, भोई समाजमंदिर तुळजाभवानी नगर, प्रियदर्शिनी समाजमंदिर लेबर कॉलनी, समाजमंदिर सम्नाट चौक, समाजमंदिर संजयनगर, समाजमंदिर संत गोरोबा सोसायटी, मनपा शाळा जुनी यशवंत शाळा साळे गल्ली, मनपा शाळा क्र. ९ मंठाळे नगर, मनपा शाळा क्र. ३ बादाडे नगर, मनपा शाळा क्र.३ सोफिया मस्जिद, मनपा शाळा क्र. २६ मिलिंद शाळेजवळ, मनपा शाळा क्र. ५ आनंदनगर, मनपा शाळा क्र. ५ राजीव नगर, क्षेत्रीय कार्यालय सी, क्षेत्रीय कार्यालय डी मध्ये चर्मकार समाजमंदिर साळे गल्ली, ढोर समाजमंदिर सिद्धेश्र्वर चौक, अण्णा भाऊ साठे समाजमंदिर विलासनगर, काशीनाथ समाजमंदिर वैदू वस्ती, रमाबाई माता समाजमंदिर रमाबाई नगर, यशवंत शाळा नांदेड रोड, पूर्णानंद मंगल कार्यालय खोरी गल्ली, मनपा शाळा क्र. २८ केशवनगर, मनपा शाळा क्र. ३२ बरकत नगर, भदंत महाथेरो चंद्रमुनी बौद्धविहार गवळीनगर, शहरातील सर्व नागरी आरोग्य केंद्र, मनपा ऊ–ध–छ्णडच् शहर अभियान व्यवस्थापन कक्ष रूम नंबर ११ या ठिकाणी करण्यात आली आहे.

तरी शहरातील जास्तीत जास्त पात्र महिलांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन महानगरपालिका आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी केले आहे.

# झरोका

एक. भारतीय समाजकारण, राजकारण, सत्ताकारण असं एकूणच सर्वकष क्षेत्रात महिलांना समान संधी आहे ती घटनात्मक आहे पण भारतीय प्रशासन सेवेत आयएएस अधिकारी म्हणून नव्यानेच कार्यरत असलेले पूजा खेडकर ही कोण आहे तीस कोणाचा वरदहस्त आहे ती अफलातून अधिकाऱ्याचा गैरवापर कसा काय करते हे सारे घडत असताना तीच पूजा वाशिम जिल्हा अधिकारी कार्यालयात कशी काय रुजू होते हेच कळत नाही ही पूजा खेडकर अबला की सबला हेच कळत नाही हे शिंदे शासन आहे की फडणवीस चे प्रशासन आहे सारे काही अजब वाटते. डोकं भरकटलं आहे.

दुसरा – अरे, असा कसा सरकल्या सारखा बोलतो आहेस. शासक-शासन, प्रशासन आणि लोकप्रतिनिधी हे एकमेकांना सांभाळून घेत असतात. नवीन काही नसते. आज घडीला पूजा खेडकर नवीन असलीत त्या उद्या अनुभवी, विभागप्रमुख किंवा सचिव मुख्य सचिव झाल्यावर तर सत्तेवर येणाऱ्या-जाणाऱ्याची काय गत होईल त्यांची लोकप्रतिनिर्धींना शासकांना भीती असते म्हणूनच पुजा खेडकर या राजरोष पणे शासकीय सेवेचा मनमुराद आस्वाद घेत आहेत त्यात तुला अडचण काय ते कळतच नाही.

एक – अहो, वाकडं ते वाकडं अन् फाटक्यात पाय ही स्वयं जात नाही तुमची मी आयएएस अधिकारी पूजा खेडकर बद्दल बोलतोय कोणा पंचफुला चौकातील महिले संबंधात बोलत नाही. अनेक महिला राजकारणी-सताकारणी, प्रशासकीय अधिकारी, गृहिणी होऊन गेल्या-आहेत पण ही भलतीच दिसतंय म्हणून बोलतोय.

दुसरा – अरे, समजून घेतले पाहिजे. उतावळी नवरा गुडघ्याला बाशिंग असते अशीच आयएएस झाल्याची मस्ती त्यांच्या अंगी आली असेल पण त्या नंबर वन मधील शासकीय अधिकारी असल्याने आपण त्यांची चूक काढू शकत नाही. त्यांच्यासमोर नतमस्तक झालेच पाहिजे डोकं ठिकाणावर ठेवून काम कर-बोल.

एक – अहो, मुळातच त्या अपंग, भोळसर, व्यंग नाहीतच पण त्या अशा पदांवर विराजमान झाल्यात, त्या संदर्भात सामाजिक न्यायमंत्री रामदास आठवले यांनी चौकशीतून दोषी किंवा निर्दोषत्व ठरेल त्यानुसार कारवाई झाली पाहिजे असे म्हटले आहे त्याचे काय.

दुसरा – अरे ते सामाजिक न्याय मंत्री महोदयनाच ज्ञात असावे. समजलं.

## काय बोलता राव ?

काँग्रेस, तेलगू देशम, जेदयु, वगैरे राजकीय पक्ष जातनिहाय जनगणना झालीच पाहिजे. त्यावर आरक्षणाचा मार्ग मोकळा होईल असे स्पष्ट मागणी करीत असतानाच रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गटाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय सामाजिक न्यायमंत्री रामदास आठवले यांनीही जात निहाय जनगणनेच्या मागणीत सुर आवळला आहे.

**काय बोलता राव,**

अरे, केंद्रीय सामाजिक न्यायमंत्री रामदास आठवले हे पुणे येथील कार्यक्रमासाठी आले होते. त्यांनी कायद्याने जात संपुष्टात आली असली तरी जात लिहिल्याशिवाय आरक्षण मिळत नाही. जात लोकांच्या मनात रुजलेली आहे. त्यामुळे जात निहाय जनगणना झालीच पाहिजे त्याशिवाय जात निहाय लोकसंख्या कळूच शकत नाही असे स्पष्ट करून राहुल गांधी बद्दल काव्यात्मक कौतुक करणे विसरले नाहीत पण आठवले यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची साथ सोडणार नसल्याचे स्पष्ट केल्याने जात निहाय जनगणनेबद्दल काय ते रामदास आठवले यांच्यातील रामच जाणे मग बोला दाजीबा.

## विकसित भारताची संकल्पना

**(पान १ वरुन)**– विद्यार्थिनी, प्राध्यापकांना संबोधित केले. याप्रसंगी राज्याचे राज्यपाल रमेश बैस, उपराष्ट्रपतींच्या पत्नी डॉ.सुदेश धनखड , राज्यसभेचे सदस्य प्रफुल्ल पटेल, एन एम आय एम एस अभिमत विद्यापीठाचे कुलपती अमरीश पटेल, कुलगुरू रमेश भट उपस्थित होते. उपराष्ट्रपती श्री.धनखड यांनी 'भारताचे सक्षमीकरण : विकसित भारत २०४७ घडवण्यात उच्च शिक्षण संस्थांची भूमिका' याविषयी विचार व्यक्त केले. ते म्हणाले, २०४७ मधील विकसित भारतासाठी आपल्या सर्वांचे योगदान बहुमूल्य आहे. मी यास १९४७ नंतरचे हे दुसरे मिशन म्हणून पाहतो आहे. गुणवत्ता पूर्ण शिक्षण व्यक्तीच्या जीवनात चमत्कार घडवते आहे. शिक्षण नवोन्मेषाला चालना देते, आर्थिक वाढीला प्रोत्साहन देते आणि स्वप्ने तसेच महत्वाकांक्षासाठी मार्ग बनवते. शिक्षण हे व्यक्ती, समाज, आणि देशाच्या विकासात मोठे काम करते. व्यक्ती आणि समाजाला सक्षम बनवण्याची शक्ती शिक्षणातून निर्माण होते.उच्च शिक्षण हे राष्ट्राच्या विकासासाठी आणि सक्षमीकरणासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. आजचे युवक व विद्यार्थी हे उद्याचे जबाबदार नागरिक असून भविष्यातील देशाचे आधारस्तंभ आहेत. ते म्हणाले, २०४७ मधील विकसित भारताला घडविण्यासाठी आपल्या सर्वांचे योगदान बहुमूल्य ठरणार आहे. विद्यार्थी व युवकांनी कोषामधून बाहेर पडून भविष्यातील या संधीचा वेध घ्यावा, आजची युवा पिढी चांगल्या पद्धतीने विकसित झाली पाहिजेत. आपण अजूनही स्पर्धा परीक्षांच्या गराड्यात आहोत. फार प्राचीन काळापासून नालंदा, तक्षशिला, विक्रमशिला अशा सर्वोत्कृष्ट, नामांकित विद्यापीठांचा, प्राचीन शिक्षण पद्धतीचा परंपरेचा वारसा भारताला लाभला आहे. या संस्थांनी भारताला एक शक्ती स्थानी बसवले आहे. जागतिक पटलावर भारत मुत्सद्देगिरीतील मोठी सुप्त शक्ती आहे, या प्रेरणादायी इतिहासाचा उच्चार त्यांनी केला. उपराष्ट्रपती श्री.धनखड मार्गदर्शन करताना पुढे म्हणाले, मनात जिद्द आणि चिकाटी असली की विद्यार्थी कुठेही पोहचवू शकतो.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावांवरची नौटंकी सहनशिलतेच्या बाहेरचीच !

## संपादकीय...

राजकारण, सत्ताकारणातील बदल, वाढत असलेला असंतोष विरोधी चळवळ यामूळे भयभित झालेले महाराष्ट्रातील भाजपानेते माजी मुख्यमंत्री तथा विद्यमान शिंदे सरकारमधील उपमुख्यमंत्री असलेले देवेंद्र फडणवीस यांच्या पायाखालची वाळू घसरत असल्याने ते आंबेडकरी जनतेचे स्मारक पूढील वर्षीच आणी दुसरे ही तात्काळच कार्यान्वीत करणार असे सुतोवाच खूद्द देवेंद्र फडणवीस यानी मुंबईच्या परळ येथील एका बैठकीत केल्याने आंबेडकरी जनतेच्या भुवया उंचावल्या असल्यास त्यात नवल कसले. नागपूरच्या दिक्षाभूमीला वंदन करुन नागपूर महापालीका ते आमदार, मंत्री, उपमुख्यमंत्री म्हणून कार्यरत असलेले आणि राष्ट्रीय स्वंयसेवक संघाचे पाईक सदस्य असलेले देवेंद्र फडणवीस हे जनतेला भुलविण्यात पटाईत असल्यानेच गोर, गरीब, दलित, मागासवर्गीयाचा तमाम लोकशाही, संविधानवादी धर्मनिरपेक्ष विचाराच्या नागरीकांचे काळीज असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे प्रस्तावित स्मारक पूढील वर्षी अशी घोषणा करुन तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यानी स्वतः चीच अक्कल राष्ट्रीय स्वंयसेवक संघाच्या प्रांगणात ठेवली की काय अशीच प्रतिक्रिया भाजपा वर्तूळात होताना दिसते आहे.

मागील काळात केंद्रात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी तर महाराष्ट्रात देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री होते. मुंबईतील चैत्यभूमी, इंदूमिल परिसरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भव्यस्मारक व्हावे ही कॉग्रेसी सरकारातली मागणी पण ती सत्तात्तरांनंतर वेग घेतली. आंबेडकरी जनता सुखावली. पँथर नेते रामदास आठवले यानी कॉग्रेसची, शरद पवाराची नाळ तोडून ते मनमानी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या माध्यमातून मोदी, भाजपाच्या दावणीत बसले असले तरी ते सामाजीक न्यायमंत्री म्हणून केंद्रात सक्रिय असले तरी वास्तवात मागासवर्गीयाचे कल्याण तर करीत नाहीतच परंतू डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या तत्वाला धूळ चारीत असल्याचेच त्यांचेच बाहूले सांगत असताना दिसत असल्यानेच डॉ. आंबेडकर स्मारकावरुन देवेंद्र फडणवीस हे नौटंकी करीत असावेत हे रामदास आठवले याना कोण सांगावे. हा प्रश्न अनुत्तरीतच राहाताना दिसतो आहे हे वास्तव नाकारता येत नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मुंबईतील राष्ट्रीय स्मारक डॉ. आंबेडकर भवन, राजगृहाचे नुतनीकरण, महू येथील मूळ निवास स्थान, लंडन मधील निवास हे राष्ट्रीय स्मारकाच्या घोषणा, मोदी, फडणवीस यांच्याच आहेत ना, मग त्यांना त्या पूर्णत्वास नेण्यास कोणी अडविले मग वेळोवेळी राजकीय खेळी कशासाठी करायची हेच आजघडीला देवेंद्र फडणवीस यानी स्पष्ट करावे अशी लोकभावना व्यक्त होताना दिसते आहे.

बाबासाहेबाच्या परळ येथील बीआयटी चाळभत खूद्द शाहू महाराज यानी ही डॉ. आंबेडकर याना प्रोत्साहीत केले होते याच चाळीतून महाड चवदार तळे, काळराम मंदीर प्रवेश, धर्मातराची घोषणाही केली आहे त्याचा इतिहास आंबेडकरवाद्याना सांगण्याची गरज नाही तूम्ही सत्ताधारी लोक, विरोधी पक्ष नेते काय करणार आहोत याची स्पष्टोक्ती करावी, कार्यान्वीत करावी अन्यथा अशा भुलथापा आणी घोषणाना, ग्वाहीला आंबेडकरी जनता, दलित-बहूजन, बाराबलूतेदार जनता सहन करणार नाही कारण ही सारी जमात सुशिक्षीत, वैचारीक वळणार आली असून पर्याय शोधत आहे. त्यामूळे कोणाच्या सांगण्यावरुन किवा स्वतः होऊन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री तथा विद्यमान उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यानी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नांव घेवून किंवा त्यांच्या स्मारकाच्या आशा पल्वीत करुन जनतेचा विश्वासघात करु नये अशची वास्तव लोकभावना व्यक्त होत असून या विषयावर अन्य लोकप्रतिनिधी किंवा प्रसारमाध्यमानी ही अंग काढून घेतल्याची कुजबूज राजकीय वर्तूळात होत असून उद्याच्या विधानसभा निवडणुकीत भारतासह परदेशी वास्तवात असलेल्या देवेंद्र फडणवीस यांच्या घोषणेमूळे इतर राजकीय पक्ष, सामाजीक संघटना सतर्क झाल्या नसतील, असतील तर ते ही एक आश्चर्यच मानावे लागेल.

# विधानपरिषदेचे कामकाज राष्ट्रगीताने संस्थगित

मुंबई, : विधानपरिषदेच्या पावसाळी अधिवेशनचे कामकाज राष्ट्रगीताने संस्थगित करण्यात आल्याची घोषणा उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी विधानपरिषदेत केली. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह विधान परिषदेचे सदस्य उपस्थित होते.

दि. २७ जून ते दि. १२ जुलै, २०२४ या दरम्यान अधिवेशनाच्या कामकाजात एकूण बैठकींची संख्या १३, प्रत्यक्षात झालेले कामकाज ६० तास, २६ मिनिटे, रोजचे सरासरी कामकाज ४ तास ३८ मिनिटे, अन्य कारणांमुळे वाया गेलेला वेळ.

६ तास १० मिनिटे, नवनिर्वाचित सदस्यांचा परिचय ०४ सदस्य, अध्यादेश सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले ०२, शोक प्रस्ताव ५, अभिनंदनपर प्रस्ताव १,

तारांकित प्रश्न प्राप्त झालेल्या प्रश्नांची संख्या १४९४, स्वीकृत झालेल्या प्रश्नांची संख्या ४२८, उत्तरीत झालेल्या प्रश्नांची संख्या ५५ अशी होती.

अतारांकित प्रश्न प्राप्त झालेल्या प्रश्नांची संख्या २, तारांकित प्रश्नांतून अतारांकित झालेल्या प्रश्नांची संख्या ३५६, प्राप्त झालेल्या उत्तरित प्रश्नांची संख्या (मागील सत्रातील स्वीकृत प्रश्नांसह) १८०, अल्पसूचना प्रश्न प्राप्त झालेली संख्या निरंक,स्वीकृत झालेली संख्या निरंक, उत्तरित झालेली संख्या निरंक, सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीसंबंधी अर्धा तास चर्चेच्या सूचना प्रश्नांच्या उत्तरातून उद्भवलेल्या – प्राप्त झालेली संख्या २४, स्वीकृत झालेली संख्या १३, चर्चा झालेली संख्या ०१, इतर बाबीतील (सर्वसाधारण) प्राप्त झालेली संख्या ४१, स्वीकृत झालेली संख्या ३३, चर्चा झालेली संख्या ०४

म.वि.प. नियम ९३ अन्वयेच्या सूचना : प्राप्त सूचना ५२, स्वीकृत सूचनांची संख्या




१३, सभागृहात निवेदने झालेल्या सूचनांची संख्या १३, सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेली एकूण निवेदने ९, म.वि.प.नियम २६० अन्वये प्रस्ताव प्राप्त झालेल्या प्रस्तावांची संख्या ०४, चर्चा झालेल्या प्रस्तावांची संख्या ०४,

म.वि.प.नियम २८९ अन्वये प्रस्ताव प्राप्त झालेल्या प्रस्तावांची संख्या ३३, मान्य झालेल्या प्रस्तावांची संख्या निरंक, चर्चा झालेल्या प्रस्तावांची संख्या निरंक.

शासकीय ठराव, सूचनांची संख्या १, लक्षवेधी सूचना प्राप्त झालेल्या सूचनांची संख्या ५४९, मान्य झालेल्या सूचनांची संख्या १२८,चर्चा झालेल्या सूचनांची संख्या ३३, विशेष उल्लेखाच्या सूचना प्राप्त सूचनांची संख्या १९०, मांडण्यात आलेल्या व पटलावर ठेवलेल्या सूचनांची संख्या : १५७.

औचित्याचे मुद्दे : प्राप्त झालेले औचित्याचे मुद्दे १०९, मांडण्यात व पटलावर ठेवण्यात आलेले औचित्याचे मुद्दे ८३, नियम ४६ अन्वये मंत्री महोदयांनी केलेली निवेदने ०२, नियम ४७ अन्वये केलेली निवेदने निरंक.

अल्पकालीन चर्चा (म.वि.प.नियम ९७ अन्वये )प्राप्त सूचनांची संख्या ०८, मान्य झालेल्या सूचनांची संख्या ०८, चर्चा झालेल्या सूचना निरंक.

शासकीय विधेयके – विधानपरिषद ०३, विधानपरिषद विधेयके पुरःस्थापित करण्यात आली ०३,संमत करण्यात आलेली विधेयके.

विधानसभा : विधानसभा विधेयके पारित करण्यात आली ०६, विधानसभेकडे शिफारशीशिवाय परत पाठविण्यात आलेली विधेयके (धन विधेयक) ०३, संयुक्त समितीकडे पाठविलेले विधेयक, अशासकीय विधेयके, प्राप्त झालेल्या सूचना ०६, स्वीकृत सूचना ०३, पुरःस्थापना ०३, विचारार्थ ०३.

अशासकीय ठराव : एकूण प्राप्त झालेल्या सूचनांची संख्या ९०, स्वीकृत झालेल्या सूचनांची संख्या ७५,चर्चा झालेल्या सूचनांची संख्या निरंक, अंतिम आठवडा प्रस्तावाची संख्या ०१, सन्माननीय सदस्यांची उपस्थिती जास्तीत जास्त उपस्थिती ९० टक्के, कमीत कमी उपस्थिती ४४ टक्के, एकूण सरासरी उपस्थिती ७७.०८ टक्के राहिली.

# घटस्फोटाचे वाढते प्रमाण चिंताजनक

लग्नाच्या गाठी स्वर्गात बांधल्या जातात असे म्हटले जाते. पूर्वी या गाठी घट्ट बांधल्या जायच्या कारण या गाठी आयुष्यभर तुटत नसायच्या. इतकंच काय तर हाच जोडीदार पुढील सात जन्मी मिळो अशी प्रार्थना पतिपत्नी देवाकडे करायचे. हल्ली मात्र या लग्नाच्या गाठी सैल बांधल्या जातात की काय अशी शंका येऊ लागली आहे कारण आयष्यभर सोडाच पण काही वर्षे देखील विवाह झालेले दांपत्य एकत्र नांदायला तयार नाहीत. लग्नानंतर अवघ्या काही वर्षात पतीपत्नीमध्ये वाद होतो आणि हा वाद थेट घटस्फोटापर्यंत पोहचतो.

आज देशातील न्यायालयात घटस्फोटाचे लाखो याचिका प्रलंबित आहेत. दररोज त्यात भर पडतेच, घटस्फोटाची नवी याचिका दाखल झाली नाही असा एकही दिवस उगवत नाही. घटस्फोटाचे लाखो खटले प्रलंबित असल्याने सहा महिन्यांचा आत घटस्फोटाचा निकाल द्यावा असा निर्णय न्यायालयाने घेतला आहे. घटस्फोटाचे खटले तातडीने निकाली काढले जात असले तरी त्यात नव्याने भर पडत असल्याने न्यायालयही हतबल झाले आहे. वास्तविक दोन दशकांपूर्वी घटस्फोटाचे प्रकरण नगण्य स्वरूपात होते. शेवटचा पर्याय म्हणून घटस्फोटाकडे पाहिले जात होते आज मात्र अगदी किरकोळ कारणांवरून देखील घटस्फोट मागितला जातो. आज न्यायालयात दाखल होणाऱ्या घटस्फोटाची कारणे पाहिले तर चक्रावून जाल.

पत्नीला साडी नेसता येत नाही, पत्नीने केलेला स्वयंपाक बेचव असतो, पत्नी सतत टीव्ही आणि मोबाईलवर असते, पत्नी आपला मान राखत नाही यासारख्या हास्यास्पद आणि मनाला न पटणाऱ्या कारणांनी घटस्फोट मागितला जातो. पत्नीकडूनही घटस्फोटाची अशीच काहीबाही कारणे दिली जातात. पती आपल्याला वेळ देत नाही. पती फक्त त्याच्या आई वडिलांचेच ऐकतो, पती आपल्याला बाहेर फिरायला नेत नाही, पती आपल्या मनासारखं वागत नाही अशी हास्यास्पद कारणे देऊन घटस्फोटाची मागणी केली जाते. घटस्फोटाची ही किरकोळ कारणे जितकी हास्यास्पद वाटतात तितकीच ती चिंताजनक देखील आहेत कारण अशा किरकोळ कारणांनी जर घटस्फोट होऊ लागला तर विवाह संस्थाच धोक्यात येईल. याशिवाय पती मारहाण करतो, अनैसर्गिक संबंधांची मागणी करतो, पत्नी उलट बोलते, पती म्हणून मान देत नाही अशा कारणांनी देखील घटस्फोटाची मागणी केली जाते अशी आणि यापेक्षाही अनेक वेगवेगळी कारणे घटस्फोटासाठी दिली जातात अर्थात सर्व कारणांचा अभ्यास करूनच न्यायालय घटस्फोटाचा निकाल देते.

अर्थात अशा किरकोळ कारणांसाठी घटस्फोटाची मागणी करणे कितपत योग्य आहे याचा विचार दोघांनीही करायला हवे. नाते कोणतेही असो त्यात राग रुसवा असतोच, संसार म्हटले की भांड्याला भांडे लागतेच, जर दोघात वाद झाला की दोघांपैकी एकाने शांत राहावे थोड्या वेळात राग शांत होतो आणि वादही मिटतो मात्र शब्दला शब्द दिला की वाद वाढतो आणि वादाचे रूपांतर मोठ्या भांडणात होते. त्यात दोन्ही कडील नात्यात कोणीना कोणी तेल ओतणारा असतोच, असे तेल ओतणारे व्यक्ती आल्यास हा वाद थेट न्यायालयात पोहचतो. अगदी क्षुल्लक कारणही नाते तोडायला पुरेसे ठरत असल्याने नात्याची गुंफण घालताना थोडे सावरूनच वागावे लागते. माझे चुकलेच हे मनाने मान्य करावे लागते.

तरच नाते टिकते आणि त्यातही गोडवा राहतो. नात्यात सर्वात महत्वाचा असतो तो विश्र्वास. जर विश्र्वासाला तडा गेला तर नात्यात वितुष्ट येतेच म्हणून पतिपत्नी मध्ये विश्र्वास खूप महत्वाचा आहे विश्र्वासाला तडा जाऊ न देण्याची जबाबदारी दोघांचीही आहे. नात्यात दुरावा होण्याचे आणखी एक महत्वाचे कारण म्हणजे पतीपत्नीमध्ये असलेला अहंकार. अहंकारामुळेच नाती तुटतात म्हणूनच दोघांनीही अहंकार दूर ठेवायला हवा. अहंकाराला दूर ठेवून परस्परावरील विश्र्वास कायम ठेवला तर नात्यात दुरावा निर्माण होणार नाही आणि घटस्फोटाचे प्रमाणही कमी होईल.

**श्याम ठाणेदार,दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# प्रलंबित, तडजोडपात्र प्रकरणासाठी २९ जुलै ते ३ ऑगस्ट

मुंबई, : लोकअदालतीद्वारे पक्षकारांना जलद गतीने मिळणारा दिलासा लक्षात घेता सर्वोच्च न्यायालयाने त्यांच्याकडे प्रलंबित असलेली तडजोडपात्र प्रकरणे जलद गतीने निकाली काढण्यासाठी विशेष लोकअदालत सप्ताहाचे आयोजन केले आहे. ही विशेष लोकअदालत २९ जुलै ते ३ ऑगस्ट २०२४ या दरम्यान होणार आहे.

लोकअदालतीमध्ये तडजोडीद्वारे निकाली निघालेल्या प्रकरणांमुळे प्रकरणातील पक्षकारांसोबत शासन आणि समाज या दोन्ही घटकांना मोठा लाभ प्राप्त झाला आहे. लोकअदालतीमुळे न्यायालयातील प्रलंबित खटल्यांची संख्या कमी करण्यामध्ये मोठ्या प्रमाणात यश प्राप्त झाले आहे. न्यायालयातील तडजोड पात्र प्रलंबित प्रकरणे सामंजस्यातून तडजोडीद्वारे निकाली काढण्याकरिता लोकअदालत हे प्रभावी माध्यम म्हणून समोर आलेले आहे. यामुळे विशेष लोकअदालती मार्फत सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेली तडजोडपात्र प्रकरणे लोकअदालतीच्या माध्यमातून निकाली काढण्यात येणार आहेत.

सर्वोच्च न्यायालयाने लोकअदालतमध्ये ठेवलेल्या प्रकरणांची यादी हींींि:// श्रशसरश्रीर्शीींळलशी.ारहरीरीहींर.सीं.ळप/ या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तरी ज्यांची प्रकरणे या यादीमध्ये असतील त्यांनी स्वतः अथवा वकिलांमार्फत महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई किंवा संबंधित जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाशी संपर्क साधून याचा लाभ पक्षकारांनी घ्यावा, असे आवाहन सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांनी केले आहे.

संपर्कासाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे संपर्क क्रमांक (कंसात) पुढीलप्रमाणे : अकोला (८५९१९०३९३०), बीड (८५९१९०३६२३), चंद्रपूर (८५९१९०३९३४), गोंदिया (८५९१९०३९३५), कोल्हापूर (८५९१९०३६०९),नांदेड(८५९१९०३६२६), धाराशिव (८५९१९०३६२५), रायगड (८५९१९०३६०६), सातारा (८५९१९०३६११), ठाणे (८५९१९०३६०४), यवतमाळ (८५९१९०३६२९), अहमदनगर (८५९१९०३६१६), अमरावती (८५९१९०३६२७), भंडारा (८५९१९०३९३६), धुळे (८५९१९०३६१८), जळगाव (८५९१९०३६१९), लातूर (८५९१९०३६२४), नंदुरबार (८५९१९०३९३९), , परभणी (८५९१९०३६२२), रत्नागिरी (८५९१९०३६०८), सोलापूर (८५९१९०३६१३), वर्धा (८५९१९०३९३२), मुंबई (८५९१९०३६०१), छत्रपती संभाजीनगर (८५९१९०३६२०), बुलढाणा (८५९१९०३६२८), गडचिरोली (८५९१९०३९३३), जालना (८५९१९०३६२१), नागपूर (८५९१९०३९३१), नाशिक (८५९१९०३६१५), पुणे (८५९१९०३६१२), सांगली (८५९१९०३६१०), सिंधुदूर्ग (८५९१९०३६०७), वाशीम (८५९१९०३९३७) आणि मुंबई उपनगर (८५९१९०३६०२).

# 'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजने'चा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज शुभारंभ

मुंबई, : रोजगार निर्मिती करून देश प्रगतीपथावर नेण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी एका वर्षात ५० लाख रोजगार निर्मितीचा संकल्प केला आहे. रोजगार वाढीसाठी केंद्र सरकारच्या या निर्णयावर आधारित राज्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्यमंत्री जनकल्याण कक्ष आणि कौशल्य विकास विभागामार्फत ग्रामीण व शहरी रोजगार निर्मिती वाढीसाठी प्रोत्साहन देण्यासाठी 'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना' सुरू केली जात आहे.

राज्यातील युवकांना प्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध होऊन रोजगार मिळण्याच्या संधी निर्माण होणार आहेत. महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाअंतर्गत राबवण्यात येणाऱ्या या योजनेचा शनिवार, दि. १३ जुलै २०२४ रोजी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते शुभारंभ होणार आहे. गोरेगावमधील नेस्को प्रदर्शन मैदान येथे १३ जुलै रोजी सायंकाळी ५.३० वाजता हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा म्हणाले की, युवकांनी शिक्षण पूर्ण केल्यानंतर ते नोकरी व्यवसायाच्या शोधात असतात. युवकांना व्यवसाय व नोकरी प्राप्त करण्यासाठी त्यांच्या क्षेत्रातील कौशल्य प्राप्त व्हावे, यासाठी शासन त्यांच्यासोबत आहे. १२ वी उत्तीर्ण, आयटीआय व पदविका उत्तीर्ण, पदवीधर आणि पदव्युत्तर उत्तीर्ण यामधील युवकांचा या योजनेत समावेश करण्यात आलेला आहे. उद्योजक आणि बेरोजगार युवकांमध्ये संवाद निर्माण करून त्यांना उद्योग व्यवसायाच्या त्यांच्या क्षेत्रातील संधी उपलब्ध व्हाव्या, यासाठी प्रशिक्षण देण्यात येणार आहे आणि त्यांनी प्राप्त केलेल्या कौशल्यानुसार रोजगाराच्या संधी निर्माण करून दिल्या जाणार आहेत.

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेकरिता ५ हजार ५०० कोटींची तरतूद करण्यात आली असून, उमेदवाराचे वय १८ ते ३५ वर्षे या वयोगटातील असावे, उमेदवारांना प्रशिक्षण कालावधीत १२ वी उत्तीर्णसाठी ६ हजार रुपये, आयटीआय व पदविका उत्तीर्णसाठी ८ हजार रुपये आणि पदवीधर आणि पदव्युत्तर उत्तीर्णसाठी १० हजार रुपये दरमहा विद्यावेतन मिळणार आहे. तसेच कार्य प्रशिक्षण (इंटर्नशिप) कालावधी सहा महिने असणार आहे. या योजनेचा युवकांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, या प्रशिक्षण कार्यक्रमात सहभाग घ्यावा, असे आवाहन मंत्री श्री. प्रभात लोढा यांनी केले आहे. कौशल्य रोजगार उद्योजकता विभागाचे सचिव गणेश पाटील, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीच्या आयुक्त निधी चौधरी यांनी या कार्यक्रमात युवकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन केले आहे.

## उपदेशकथा,तिसरा फटका

काही कामासाठी गावातील शाळेच्या मुख्याध्यापकांना भेटायला गेलो होतो. त्यांच्याशी बोलत असताना एक शिक्षक काही मुलांविरुद्ध तक्रार घेऊन आले. मुख्याध्यापकांनी त्यांची तक्रार ऐकून घेतली. म ुलांना आत बोलावले. टेबलाखालून छडी काढली आणि एकेका मुलाच्या हातावर दोन-दोन छड्या मारल्या. शेवटचा मुलगा दोन छड्यानंतर जायला वळला. मुख्याध्यापक म्हणाले, 'थांब' तो थांबला. छडी पुन्हा वर गेली. 'तिसरा फटका' 'आता जा', ते कठोरपणे म्हणाले. मुलगा निघून गेला. थोड्याच वेळात मी बाहेर पडलो, पायऱ्यांजवळ योगायोगाने मला तोच मुलगा दिसला. नकळत माझी उत्सुकता प्रकट झाली. त्याला थांबवून मी विचारले, 'काय रे, मुख्याध्यापकांनी तुला एक छडी अधिक का मारली?' 'ते माझे वडील आहेत', मुलाने उत्तर दिले. 'काय केले होतेस?' मला राहवेना. 'खरं तर मी काहीच केलं नव्हतं. पण शिक्षकांना कसं पटवून देणारं? मग शिस्तीसाठी खाल्ल्या छड्या' मी म्हणालो, 'आता घरी गेल्यावर?' 'घरी यातलं काहीही राहणार नाही कारण मी काही गैर केलं नाही हे बाबांना नक्कीच माहीत आहे. तेवढा विश्वास मी कमवला आहे. मी तसं उत्तर देऊ शकलो असतो पण त्यांची शिस्त मोडणं म्हणजे त्यांचा अपमान झाला असता. आमचा दोघांचाही एकमेकांवर गाढा विश्वास आहे.' मुलाचे बोलणे ऐकून मला त्याचा अभिमान वाटला.

कथा उपदेश : आई-वडिलांच्या शिस्तीचा आदर करा.

### ''मला भेटायचे असेल तर ....

**(पान १ वरुन) :** त्यामुळे मंडी मतदारसंघ क्षेत्रातील आधार कार्ड बरोबर घेऊन यावं. तसेच तुमचं जे काम असेल ते एका कागदावर लिहून आणा. याचं कारण म्हणजे कोणालाही काही अडचण येऊ नये. अन्यथा काय होतं की पर्यटक जास्त येतात. त्यामुळे सर्वसामान्य लोकांना अडचण निर्माण होते. त्यामुळे मंडी मतदारसंघ क्षेत्रातील आधार कार्ड आणि कामासंदर्भातील लेटर बरोबर आणा'', असं कंगना रणौत यांनी म्हटले आहे. दरम्यान, भाजपाच्या खासदार कंगना रणौत यांच्या आधार कार्ड बाबतच्या वक्तव्यावरून हिमाचल प्रदेशमध्ये चांगलंच राजकारण तापलं आहे. त्यांच्या या विधनानंतर अनेकांनी नाराजी व्यक्त केली आहे. तसेच काँग्रेसकडून कंगना रणौत यांच्यावर टीका करण्यात आली आहे. काँग्रेस नेते विक्रमादित्य सिंग यांनी कंगना रणौत यांच्या विधानावर प्रतिक्रिया देताना म्हटलं की, ''लोकप्रतिनिधीला कुणीही भेटू शकतो. कारण लोकांच्या समस्या दूर करणं ही जबाबदारी लोकप्रतिनिधीची असते. त्यामध्ये सर्व समाजातील लोकांना भेटणं त्यांची कामे करणं ही त्यांची जबाबदारी आहे. मात्र, त्यांना भेटण्यासाठी आधार कार्ड बरोबर आणावं असं सांगण्याची गरज नाही'', अशी टीका काँग्रेसचे नेते विक्रमादित्य सिंग यानी केली.

## विलास सहकारी साखर कारखान्यास साखर आयुक्तालय, पुणेचे संचालक यशवंत गिरी यांची सदिच्छा भेट

लातूर प्रतिनिधी - यशवंत गिरी, संचालक (अर्थ), साखर आयुक्तालय, पुणे यांनी विलास सहकारी साखर कारखान्यास दिनांक १२ जुलै रोजी सदिच्छा भेट दिली. सदरील प्रसंगी कारखान्याच्या वतीने व्हा.चेअरमन रविंद काळे यांनी त्यांचे स्वागत केले.

या भेटीमध्ये त्यांनी कारखान्याच्या कामकाजाचा आणि कारखान्याची आर्थिक स्थितीचा बारकाईने आढावा घेऊन समाधान व्यक्त केले. शासकीय देणी ची मुदतपूर्व परतफेड, एफ.आर.पी.चे संपूर्ण पेमेंट, कर्मचारी देणी थकीत नाहीत व सर्व कर्जाची वेळेत परतफेड तसेच मांजरा परीवारातील व्यवस्थापन व प्रशासनाने ऊस उत्पादकता वाढवणे, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, शेतकऱ्यांसाठी प्रशिक्षण, कर्मचारी आणि शेतकऱ्यांचे कल्याण व्यवस्थापनाने केलेल्या उत्तम आर्थिक नियोजनाचे आणि कल्याणकारी निर्णयांचे त्यांनी कौतुक केले.

विलास सहकारी साखर कारखान्याने ऊभारणी पासून सर्वच हंगाम यशस्वीपणे पार पाडून सभासद, ऊसउत्पादक शेतकरी यांच्या हिताचे काम केले आहे. विलास कारखान्यासह मांजरा परीवारातील सर्व कारखान्यांची कामगिरी, आर्थिक नियोजन, सभासद - कर्मचारी योजना, प्रशासकीय कामकाज, व्यवस्थापकीय धोरण सहकार आणि साखर उदयोगासाठी अनुकरणीय असल्याचे साखर आयुक्तालय, पुणेचे संचालक यशवंत गिरी यांनी म्हटले आहे.



कारखान्याच्या वतीने ऊस उत्पादकता वाढवणेसाठी कारखान्याने ऊस विकास, एकरी ऊसाची उत्पादकता, पाणी व्यवस्थापन आणि ऊस तोडणी यांत्रिकीकरण यांमध्ये लक्षणीय कामगिरी केली आहे. तसेच आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन कारखान्याने ठिबक सिंचन, माती परीक्षण, पथदर्शक ऊस लागवड, सुधारीत वाणांचा वापर यांसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला आहे. आधुनीक ऊसशेतीसाठी शेतकऱ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी कारखान्याने कृषी विभागातील कर्मचारी आणि ऊस उत्पादक शेतकऱ्यांना नियमितपणे प्रशिक्षण दिले आहे. कर्मचारी आणि शेतकऱ्यांचे कल्याण करणाऱ्या विविध योजना राबविल्या त्यांचे कौतूक याप्रसंगी संचालक (अर्थ), साखर आयुक्तालय, पुणेचे यशवंत गिरी, यांनी केले.

सहकारमहर्षि दिलीपरावजी देशमुख, माजी मंत्री, आमदार कारखान्याचे संस्थापक चेअरमन अमित विलासराव देशमुख, चेअरमन वैशाली विलासराव देशमुख, आमदार धिरज विलासराव देशमुख आणि संचालक मंडळाने ऊस लागवड आणि ऊस तोडणीसाठी ऊसशेती यांत्रीकीकरण योजना राबवली. विशेषत: ऊसतोडणी कामगाराची कमतरता दूर करण्यासाठी हार्वेस्टरचा मोठया प्रमाणात ऊसतोडणीसाठी केलेला वापराची योजना अनुकरणीय असल्याचे गौरोवोद्गार काढले.

यावेळी कारखान्याचे व्हा.चेअरमन रविंद्र काळे व कार्यकारी संचालक संजीव देसाई खातेप्रमुख, विभागप्रमुख व कामगार उपस्थित होते.

## जिल्ह्यात 'मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण' योजनेचे अर्ज स्वीकारण्यासाठी ठिकठिकाणी शिबिरांचे आयोजन

लातूर, (जिमाका) : जिल्ह्यातील प्रत्येक पात्र महिलेचा



'मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण' योजनेसाठी अर्ज भरून घेण्यासाठी ठिकठिकाणी विशेष शिबिरांचे आयोजन केले जात आहे. या शिबिरांमध्ये महिलांना या योजनेची माहिती देण्यासोबतच त्यांचे अर्ज स्वीकारण्याची कार्यवाही केली जात आहे. तहसीलदार, गट विकास अधिकारी यांच्यासह संबंधित तालुकास्तरीय अधिकारीही या शिबिरांना भेटी देवून महिलांना मार्गदर्शन करीत आहेत.

'मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण' योजनेतून अडीच लाखापर्यंत वार्षिक उत्पन्न असलेल्या कुटुंबातील महिलांना दरमहा १ हजार ५०० रुपयांचा लाभ दिला जाणार आहे. या योजनेसाठी ऑनलाईन अर्ज सादर करणे आवश्यक असला तरी शिबिरांच्या माध्यमातून विहित नमुन्यातील ऑफलाईन अर्ज आणि आवश्यक कागदपत्रे स्वीकारून हे अर्ज ऑनलाईन केले जात आहे. या शिबिराच्या ठिकाणी महिलांना योजनेची माहिती देवून आवश्यक कागदपत्रांविषयी मार्गदर्शन करण्यात येत आहे. शुक्रवारी जिल्ह्यात शहरी व ग्रामीण भागात अशा प्रकारची जवळपास ८९ शिबिरे घेण्यात आली.

तहसीलदार, गट विकास अधिकारी, बाल विकास प्रकल्प अधिकारी यांच्यासह विविध तालुकास्तरीय अधिकारी यांनी विविध शिबिरांना उपस्थित राहून महिलांना योजनेबाबत माहिती दिली. या योजनेसाठी ३१ ऑगस्टपर्यंत अर्ज स्वीकारले जाणार असून महिलांनी गर्दी न करता आपले अर्ज भरण्याचे आवाहन करण्यात आले.

# विविध विकास प्रकल्पांच्या माध्यमातून शासनाची लक्षणीय कामगिरी -उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई, : मागील दोन वर्षात विविध क्षेत्रात राज्य सरकारने प्रकल्प हाती घेतले असून अटल सेतू, सागरी किनारा मार्ग, समृद्धी महामार्ग, मेट्रो, सिंचन आदी प्रकल्पांच्या माध्यमातून लक्षणीय कामगिरी केली असल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान परिषदेत सांगितले. अटल सेतू हा आशियातील दुसऱ्या क्रमांकाचा सागरी सेतू असून अटल सेतू तसेच सागरी किनारा मार्ग हे केवळ मुंबईचेच नाही, तर भारताचा अभिमान असलेले प्रकल्प आहेत, असे त्यांनी सांगितले.

नियम २५९ अन्वये मांडण्यात आलेल्या अंतिम आठवडा प्रस्तावाला श्री.फडणवीस उत्तर देत होते. यावेळी त्यांनी राज्य शासनाच्या कामगिरीचा आढावा घेतला.

सिंचन आणि पाणी पुरवठा

उपमुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले, शासनाने १२३ सिंचन प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता दिली आहे ज्याची किंमत एक लाख ३४७ कोटी रुपये इतकी आहे. यामुळे १६ लाख ५७ हजार हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येत आहे. विदर्भातील सिंचनाचा मोठा अनुशेष दूर करण्यात येत आहे. महत्त्वाकांक्षी वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पाला आता राज्यपालांनी मान्यता दिली आहे. मराठवाडा विभागात एकूण एक हजार ६६ सिंचन प्रकल्प असून ९४८ पूर्ण झाले असून ११.८८ लक्ष हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झाली आहे. कृष्णा कोयना, टेंभू या प्रकल्पांना सुधारित मान्यता देण्यात आली आहे. कोकणातील प्रकल्पांची कामेही करण्यात येत आहेत. समुद्रात वाहून जाणारे पाणी वळविण्यासाठी सल्लागार नियुक्तीचे काम प्रगतीपथावर आहे. नार पार गिरणा नदीजोड प्रकल्पाद्वारे १०.६४ टीएमसी पाणी मिळून नाशिक आणि जळगाव जिल्ह्यातील जमीन सिंचनाखाली येणार आहे.

शेतकऱ्यांसाठी

राज्यातील ८४ लाख शेतकऱ्यांचे वीज पंप हे सात अश्र्वशक्तीच्या आतील आहेत. त्यामुळे सात अश्र्वशक्तीच्या आतील पंपांना वीज बिल माफी देण्यात आली आहे. मागेल त्याला सौप



पंप योजना हाती घेतली आहे. यासाठी नऊ लाख पंप मंजूर करण्यात आले असून मागील वर्षीपर्यंतचे एक लाख २४ हजार १३० पंप दिले असून केवळ ३०,८२१ पेड पेंडिंग राहिले आहेत, हे याच वर्षात दिले जाणार आहेत. कापूस आणि सोयाबीनच्या भावात कमतरता आल्याने राज्यातील ८४ लाख शेतकऱ्यांच्या थेट खात्यात मदतीचे पैसे देण्यात येणार आहेत.

रस्ते प्रकल्प

मुंबईचे रस्ते खड्डेमुक्त करण्यासाठी काँक्रिटचे करण्याचा निर्णय घेण्यात आला. मुंबई शहर विभागात ३९६ किमीचे रस्त्यांच्या कामात कंत्राटदाराने निविदा अटीचे पालन न करणाऱ्या कंत्राटदाराचे काम रद्द करण्यात आले असून त्याला दंडही ठोठावण्यात आला. दुसऱ्या निविदा काढण्यात आल्या आहेत. पश्र्चिम उपनगरात ५१६ किमी ची २१६ कामे प्रगतीपथावर आहेत. पूर्व १८२ किमीची ८९ कामे सुरू होती यातील १९ कामे पूर्ण झाली आहेत. पहिल्या टप्प्यात ९१० रस्त्यांच्या काँक्रिटीकरणाचे काम पूर्ण करायचे आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा रोडशो मुंबई महापालिकेच्या पैशातून करण्यात आलेला नाही, केवळ राजशिष्टाचाराच्या दृष्टीने अत्यावश्यक असलेला खर्च करण्यात आलेला आहे.

भेंडीबाजार भागात अर्बन रिन्युअलचे उत्कृष्ट काम सुरू आहे. धारावीचे पुनर्वसन धारावीतच असेच नियोजन करून प्रकल्पाची आखणी करण्यात आली आहे. बीडीडी चाळींच्या पुनर्विकासाचा प्रकल्प हा देशातला सर्वात मोठा नागरी विकास प्रकल्प सुरू असल्याचे उपमुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी सांगितले.

शिक्षक भरती प्रक्रियेत सुमारे ११,८८५ शिक्षकांची भरती झाली असून ६७४५ शिक्षक रुजू देखील झाले आहेत. शाळांच्या दुरुस्तीसाठी जिल्हा नियोजन समितीमधून पाच टक्के निधी राखीव ठेवण्यात येतो. यातून शाळांच्या दुरुस्तीची कामे केली जाणार असल्याचे श्री.फडणवीस यांनी सांगितले. माझी शाळा, सुंदर शाळा या उपक्रमामुळे शाळांमध्ये चांगली स्पर्धा निर्माण झाली असल्याचे ते म्हणाले.

कायदा व सुव्यवस्था

राज्यात गंभीर गुन्ह्यात तीन टक्क्यांपेक्षा जास्त घट झाली असून दोषसिद्धीच्या प्रमाण ४५ टक्के म्हणजेच ३.२ टक्क्यांनी वाढले आहे. प्रतिबंधात्मक कारवाईच्या संख्येत देखील वाढ झाली. डायल ११२ वर पोलिसांचा प्रतिसाद कालावधी २०२२ मधील १५.४१ मिनिटांच्या तुलनेत आता ६.३० मिनिटांवर आला आहे. महिला अत्याचारामध्ये मे २०२३ च्या तुलनेत ३.६ टक्क्यांची घट झाली आहे. तर गुन्हे उघडकीस येण्याचे प्रमाण तीन टक्क्यांनी वाढले आहे. नागपुरमधील बेपत्ता झालेल्या मुलींपैकी परत आलेल्यांचे प्रमाण ९७ टक्के असून नागपूरमधील परिस्थिती दाखविली जाते तितकी वाईट नसल्याचे त्यांनी नमूद केले. महिलांविषयीच्या गुन्ह्यांच्या बाबतीत शासन अतिशय संवेदनशील असल्याचे त्यांनी सांगितले. वाळू माफियांवरील कारवाईमध्ये यावर्षी मे महिन्यापर्यंत १८४९ जणांना अटक केल्याची माहिती त्यांनी दिली. मराठा आंदोलकांवर ३१ जानेवारी २०२४ पूर्वी दोषारोप दाखल झालेले १५७ गुन्हे मागे घेण्याची शिफारस केली आहे. ५३ गुन्हे मागे न घेण्याची शिफारस करण्यात आली आहे तर काही गुन्हे समितीच्या विचारार्थ असल्याचे ते म्हणाले. गुन्हे मागे घेण्याची प्रक्रिया असून दाखल गुन्हे मागे घेण्यासाठी कोर्टात जावे लागते, ते परस्पर सरकारला मागे घेता येत नाहीत, असे त्यांनी सांगितले.

पोलीस भरती

पोलिसांवरील ताण कमी करण्यासाठी भरती प्रक्रिया सुरू असून दोन वर्षात जवळपास ४२ हजार पोलिसांची भरती करण्यात येत आहे. १८ हजार पदांची भरती प्रकिया झाली असून १७ हजार पदांची प्रक्रिया सुरू आहे. ही प्रक्रिया पूर्ण होताच आणखी नऊ हजार पोलीस भरतीची जाहिरात दिली जाणार आहे. पोलिसांसाठी निवासस्थाने बांधली जात असून त्यांच्या वैद्यकीय उपचारांची सोय करण्यात येत असल्याचे ते म्हणाले. नवी मुंबईतील महापे येथे ८३७ कोटी रुपयांच्या खर्चाचा सायबर सिक्युरिटी प्रकल्प सुरू होत असून हा देशातील सर्वात डायनॅमिक प्रकल्प आहे. यामुळे बँकेतील गेलेले पैसे परत मिळवण्यातील रिस्पॉन्स टाइम कमी होण्यास मदत होणार आहे. इतर राज्यांनीही असा प्रकल्प सुरू करावा अशी सूचना केंद्र सरकारने इतर राज्यांना केली आहे. कोतवालांच्या मानधनात वाढ करण्यात आली असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

## Cholesterol संदर्भात अनेक गैरसमज; 'या' अफवेमुळे तुम्हालाही भोगावे लागले वाईट परिणाम?

आपल्या शरीरातील कोलेस्ट्रॉल नेहमी वाईट नजरेने पाहिलं जातं. कोलेस्ट्रॉल वाढू नये यासाठी तेलकट आणि गोड पदार्थ टाळणं फायदेशीर ठरतं. कोलेस्ट्रॉलमुळे रक्तामध्ये प्लाक जमा होतो, ज्यामुळे नसांमध्ये रक्तप्रवाह योग्य पद्धतीने होत नाही. यामुळे हार्ट अटॅक, हार्ट फेल्युअर, हायपरटेन्शन तसंच कोरोनरी आर्टरी डिसीज या समस्या बळावू शकतात. अनेकदा परिस्थिती गंभीर झाली की, रूग्णांचा मृत्यू देखील होऊ शकतो.

ण्प्दत्तीृदत विषयी असलेले गैरसमज कोलेस्ट्रॉलसंदर्भात अनेकांच्या मनात गैरसमज देखील आहे. नेमके हे समज काय आहेत, आणि त्यामध्ये किती तथ्य आहे, हे आज आपण जाणून घेऊया कोलेस्ट्रॉल वाईट असतं भलेही कोलेस्ट्रॉलमुळे हृदयासंदर्भातील आजार होत असतील मात्र तुमच्या शरीराला योग्य प्रमाणात कोलेस्ट्रॉल मिळणं गरजेचं आहे. मुळात शरीरातम ध्ये २ पद्धतीचे कोलेस्ट्रॉल असतात, एक थ्थ् आणि दुसरं प्थ्. एचडीएल म्हणजेच हाय डेंसिटी लिपोप्रोटीन हे चांगले कोलेस्ट्रॉल असतं. हे यकृताचं कार्य उत्तम राखण्यास मदत करतात तर कमी घनतेचे लिपोप्रोटीन हृदयासाठी हानिकारक ठरू शकतं.

फीट व्यक्ती उच्च कोलेस्ट्रॉलचा आहार घेऊ शकतात

जर तुम्हाला वाटत असेल तुम्ही फीट आहात आणि तुम्ही कोलेस्ट्रॉलचं सेवन करू शकता, तर हा समज चुकीचा आहे. तुम्ही कधीही गरजेपेक्षा जास्त कोलेस्ट्रॉलचं सेवन करू शकत नाही. असं केल्याने रक्तवाहिन्यांमध्ये प्लाक जमा होऊन रक्तप्रवाहास अडथळा येऊ शकतो. परिणामी अशा परिस्थितीमध्ये तुम्हाला हृदयाचे गंभीर आजार होण्याचा धोकाही अधिक असतो.

सर्वप्रथम तुम्हाला आहारावर नियंत्रण मिळवावं लागेल. कारण तुम्ही ज्या प्रकारचा आहार घेत आहात त्याचा शरीरावर कोणता परिणाम होते, याची माहिती असणं आवश्यक आहे. जर तुम्ही भरपूर चरबीयुक्त पदार्थ खाल्ले तर शरीरात खराब कोलेस्ट्रॉल वाढण्याची शक्यता असते. अशा परिस्थितीत या गोष्टींपासून दूर राहिल्यास बरे होईल. तुमच्या आहारात अधिकाधिक हिरव्या भाज्यांचा समावेश करा. त्याचा तुम्हाला फायदा होईल.

लठ्ठपणा-तुम्हाला माहिती आहे का की तुमचे वजन वाढल्यावर शरीरात खराब कोलेस्ट्रॉल वाढण्याचीही शक्यता असते. यासाठी वजन नियंत्रणात असणं गरजेचं आहे. यासाठी तुम्ही व्यायाम, योगा करणं आवश्यक आहे.

## (गुरु वचन) यशाच्या गमकासाठी...

यश प्राप्त करण्यासाठी नियम, सिद्धातांना प्रत्यक्षात व्यवहार आणण्याची आवश्यकता आहे. मात्र, बऱ्याचशा व्यक्ती नियम आणि व्यवहार यांची सांगड घालताना टाळाटाळ करताना दिसतात. शिक्षण खूप सारी जमीन काबीज करते; पण त्या जमि नीवर कधी शेती करत नाही. दुर्दैवाने पुष्कळ व्यक्ती धन संपत्ती खर्च करून शिक्षण घेतात. पण एखादी छोटी-मोठी नोकरी मि ळताच आपली योग्यता दाबून ठेवून आहे त्या नोकरीतच हात पाय पसरतात. आपण आपली योग्यता खुंटीला टांगून ठेवतो आणि तकलादू कार्य करण्यात आयुष्य घालवतो. ऑफिसमध्ये टांगण्यात आलेल्या घड्याळयाकडे याकरिता बघितले जाते की अजून घरी जायंला किती वेळ बाकी आहे, हे दुर्दैवी सत्य आहे. जगातला सर्वात महत्त्वपूर्ण नियम, सिध्दांत तोपर्यंत पूर्ण होऊ शकणार नाही जोपर्यंत आपण त्याचे नाते व्यवहारांशी जोडू शकत नाही.

# राज्यातील महिलांसाठी 'मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजना'

महाराष्ट्रातील माता-भगिनी आर्थिक दृष्ट्या आत्मनिर्भर व्हाव्यात, यासाठी राज्य शासनाने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू केली आहे. या योजनेच्या माध्यमातून राज्यातील महिलांच्या आरोग्य आणि पोषणाची हमी घेणार आहे. राज्यातील महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी, त्यांच्या आरोग्य आणि पोषणामध्ये सुधारणा करणे आणि कुटुंबातील त्यांची निर्णायक भूमिका मजबूत करण्यासाठी 'मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजना' सुरु करण्यात आली आहे. राज्यातील महिला व मुलींना सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याबरोबर रोजगार निर्मितीस चालना देणे, महिलांचे आर्थिक, सामाजिक पुनर्वसन करणे, राज्यातील महिलांना व मुलींना सशक्तीकरणास चालना देणे, महिला व त्यांच्यावर अवलंबून असलेल्या मुलांच्या आरोग्य आणि पोषण स्थितीत सुधारणा करणे या योजनेचा मुख्य उद्देश आहे. या योजनेअंतर्गत प्रत्येक पात्र राहिलेल्या तिच्या स्वत:च्या आधार लिंक केलेल्या थेट लाभ हस्तांतरण (ऊळीशलीं इशपशषळीं ढीरपीषशी) सक्षम बँक खात्यात दर महिन्याला १,५०० रूपये दिले जाणार आहे. तसेच केंद/राज्य शासनाच्या अन्य आर्थिक लाभाच्या योजनेद्वारे १,५०० पेक्षा कमी लाभ घेत असेल तर फरकाची रक्कम या योजनेद्वारे पात्र महिलेस देण्यात येणार आहे. याचाच अर्थ त्या महिलेला १ वर्षात १८ हजार रूपये मिळणार आहेत. या योजनेचा लाभ राज्यभरातील अधिकाधिक महिलांना घेता यावा यादृष्टीने आपल्या शासनाने अनेक अटी शिथिल करत या योजनेची प्रक्रिया अधिक सुलभ केली आहे.या योजनेअंतर्गत आता २१ ते ६५ या वयोगटातील विवाहित, विधवा, घटस्फोटित, परित्यक्त्या आणि निराधार महिलांना तसेच कुटुंबातील एका अविवाहित महिलेला दरमहा १,५०० रुपये दिले जाणार आहेत. यामुळे राज्यातील अनेक महिलांना या योजनेचा लाभ घेता येईल. या योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्ज ऑनलाईन पद्धतीने भरायचा आहे. जिथे अशक्य आहे, तिथे ऑफलाईन अंगणवाडी सेविका, सेतू सुविधा केंद्रात अर्ज जमा करता येईल. आणि घरच्या घरी मोबाईलवरुनही नारीशक्तीदूत अँपवरून ऑनलाईन अर्ज भरता येईल. योजनेच्या लाभार्थ्यांची पात्रता :- २१ ते ६५ वर्ष वयोगटातील महिलांना लाभ लाभार्थी महिला महाराष्ट्राच्या रहिवासी असणे आवश्यक. लाभार्थी महिलेच्या बँक खाते असणे आवश्यक . लाभार्थी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न २.५० लाख रूपयांपेक्षा जास्त नसावे पिवळे व केशरी रेशनकार्ड असल्यास उत्पन्न दाखला प्रमाणपत्रातून सूट देण्यात आली आहे. विवाहित,विधवा, घटस्फोटीत,परितक्त्या, निराधार आणि कुटुंबातील एका अविवाहित महिलेला लाभ. त योजनेचा लाभ मिळण्यासाठी अधिवास प्रमाणपत्र नसल्यास १५ वर्षापूर्वीचे रेशन कार्ड, मतदार ओळखपत्र, शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र, जन्मदाखला यापैकी ग्राह्य धरण्यात येणार आहे. परराज्यात जन्म झालेल्या महिलांनी महाराष्ट्रातील पुरुषाबरोबर विवाह केला असल्यास पतीचा जन्मदाखला, शाळा सोडण्याचे प्रमाणपत्र किंवा अधिवास प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येणार आहे.

या योजनेचा लाभ मिळण्यासाठी आवश्यक कागदपत्रे :- योजनेच्या लाभासाठी ऑनलाईन अर्ज. लाभार्थी महिलेचे आधार कार्ड. महाराष्ट्राचे अधिवास प्रमाणपत्र/महाराष्ट्रातील जन्मदाखला सक्षम प्राधिकारी यांनी दिलेला कुटुंबप्रमुखाचा उत्पनाचा दाखला. बॅंक खाते पासबुकच्या पहिल्या पानाची छायांकित प्रत. तासपोर्ट साईजचा फोटो. रेशन कार्ड या योजनेच्या अटी शर्तीचे पालन करण्याबाबतचे हमीपत्र.

या योजनेत अर्ज कसा करता येईल ?

ज्या महिलेस ऑनलाईन अर्ज करता येत नसेल, त्याच्यासाठी अर्ज भरण्याची प्रक्रिया अंगणवाडी केंद्रात/बाल विकास प्रकल्प अधिकारी कार्यालये/ग्रामपंचायत/वॉर्ड/सेतू सुविधा केंद्रे येथे उपलब्ध आहे.अंगणवाडी सेविका/पर्यवेक्षिका/मुख्यसेविका/सेतू सुविधा केंद्र/ग्रामपंचायत/ग्रामसेवक/ वार्ड अधिकारी यांनी ऑनलाईन प्रस्तावित केल्यावर लाभार्थी महिलेचा अर्ज सक्षम अधिकारी यांच्याकडे सादर करता येईल.अर्ज करण्याची प्रक्रिया विनामूल्य आहे. अर्जदार महिलेने स्वत: अर्ज करताना उपस्थित राहणे आवश्यक आहे जेणेकरून तिचा थेट फोटो काढता येईल आणि ई-केवायसी करता येईल.

### 'आपण पुन्हा एकत्रित आले पाहिजे...'चंद्रकात दादा आणि राऊतांमध्ये नेमकी काय चर्चा?

मुंबई : चंद्रकात पाटील आणि संजय राऊतांमधील चर्चेचा व्हिडिओ समोर: विधानभवनात आमदारांकडून मतदान सुरु असताना संजय राऊत आणि अजित पवार यांनी हस्तांदोलन केले. यानंतर राज्यसभा खासदार संजय राऊत आणि भाजपाचे नेते चंद्रकांत पाटील हे आमनेसामने आले. दोघांचा या वेळी चर्चा करतना एक व्हिडिओ व्हायरल होत आहे. यावेळी संजय राऊत म्हणतात, '' अरे व्वा, आपण तर परत एकत्र यायला पाहिजे'' दोघांनी असे म्हटले. मात्र, हा संवाद राजकीय नव्हता, चहा पिण्यासाठी एकत्र येऊया, असे म्हणायचे होते, असे संजय राऊत म्हणाले. माझी लाईन कधीही चुकत नाही, असे देखील संजय राऊत म्हणाले. व्हिडिओ व्हायरल आणि राजकीय चर्चा: जून महिन्यात उद्धव ठाकरे आणि चंद्रकांत पाटील यांचा पेढे भरवतानाचा व्हिडिओ अगदी असाच समोर आला होता. त्यावेळी देखील भाजप आणि ठाकरेंची शिवसेना एकमेकांना टाळी देणार, अश्या वावड्या उठल्या होत्या. त्याच धर्तीवर चंद्रकांत पाटील आणि राज्यसभा खासदार संजय राऊत यांचे हे संभाषण आहे.

# मुख्यमंत्री- माझी लाडकी बहीण योजनेच्या अर्ज नोंदणीसाठी तालुका, ग्रामस्तरीय सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे - जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे

लातूर, (जिमाका) : जिल्ह्यात 'मुख्यमंत्री–माझी लाडकी बहीण' योजनेचे अर्ज गावपातळीवर स्वीकारण्याची सुविध उपलब्ध करून देण्यात आली असून यासाठी ग्रामस्तरीय कर्मचाऱ्यांची समिती स्थापन केली आहे. तसेच तालुक्यातील अर्ज नोंदणीचे संनियंत्रण करणे, नाव नोंदणी शिबिरांचे नियोजन करण्याची जबाबदारी तालुकास्तरीय पथकाकडे देण्यात आली आहे. तालुका व ग्रामस्तरीय अधिकारी, कर्मचारी यांनी समन्वयाने काम करून या योजनेच्या अर्ज नोंदणीला गती देण्याच्या सूचना जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे यांनी आज येथे दिल्या. तसेच अर्ज नोंदणीचा जिल्हास्तरावर नियमितपणे आढावा घेण्यासाठी स्वतंत्र समिती स्थापन करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

जिल्ह्यातील सर्व तहसीलदार, गट विकास अधिकारी, मुख्याधिकारी, बालविकास प्रकल्प अधिकारी, तालुका कृषी अधिकारी यांच्या व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे आयोजित बैठकीत जिल्हाधिकारी बोलत होत्या. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, लातूर शहर महानगरपालिका आयुक्त बाबासाहेब मनोहरे, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, जिल्हा पुरवठा अधिकारी प्रियांका आयरे, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी जावेद शेख, नगरपालिका प्रशासनचे जिल्हा सहआयुक्त रामदास कोकरे, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी रमेश जाधव यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

मुख्यमंत्री–माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ जिल्ह्यातील प्रत्येक पात्र महिलेला देण्यासाठी जिल्हा प्रशासनाकडून गाव पातळीवर नाव नोंदणी करून घेण्यात येत आहे. गाव पातळीवर ऑनलाईन व ऑफलाईन अर्ज स्वीकारण्यासाठी तलाठी, ग्रामसेवक, कृषि सहायक, अंगणवाडी सेविका, ग्राम रोजगार सेवक, आशा सेविका यांच्यासह अन्य ग्रामस्तरीय कर्मचारी यांच्या समितीवर जबाबदारी देण्यात आली आहे. तसेच तहसीलदार, गट विकास अधिकारी, तालुका कृषि अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी, बाल विकास प्रकल्प अधिकारी, पुरवठा निरीक्षक यांचा समावेश असलेले पथक तालुक्यातील ऑनलाईन, ऑफलाईन नाव नोंदणीला गती देण्यासाठी नियोजनपूर्वक प्रयत्न करणार आहे. तरी दोन्ही पथकातील प्रत्येक अधिकारी, कर्मचारी यांनी आपली जबाबदारी योग्य प्रकारे पूर्ण करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी यांनी दिल्या.

ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर प्रत्येक बुधवारी आणि शनिवारी यादीचे चावडी वाचन केले जाणार असून यामध्ये यादीवर कोणाचे आक्षेप असल्यास नोंदवून घ्यावेत. ग्रामपंचायत व अंगणवाडी येथेही यादी प्रसिद्ध केली जाणार आहे. तसेच चावडी वाचनाची माहिती दवंडीद्वारे देवून नागरिकांना अवगत करावे. अर्जासोबत द्यावयाच्या कागदपत्रांची माहिती असलेले फलक प्रत्येक नाव नोंदणी केंद्रावर लावण्यात यावेत. त्यानुसार पात्र महिलांकडून कागदपत्रे प्राप्त करून घ्यावीत. तसेच ऑफलाईन अर्ज ऑनलाईन करण्याची कार्यवाही गतिमान करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर–घुगे यांनी दिल्या.

या योजनेच्या लाभार्थ्यांची नोंदणी अचूकपणे होण्यासाठी प्रत्येक अधिकारी, कर्मचारी यांनी काळजीपूर्वक काम करावे. तसेच योजनेचा लाभ देताना आधारकार्ड बंधनकारक असून ऑनलाईन अर्ज भरताना प्रत्येक महिलेचा अचूक आधारक्रमांक व इतर तपशील आधारकार्डनुसारच अर्जामध्ये नमूद केला जाईल, याची दक्षता घ्यावी. तसेच ऑफलाईन अर्जातील माहिती ऑनलाईन भरताना चूक होणार नाही, याची काळजी घेण्याच्या सूचना जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांनी दिल्या.

लातूर शहर महानगरपालिका क्षेत्रात मुख्यमंत्री–माझी लाडकी बहीण योजनेचे अर्ज भरून घेण्यासाठी विविध ३७ ठिकाणी विशेष केंद्र सुरु करण्यात आली आहेत. या केंद्रांवर, तसेच शहरात महत्वाच्या ठिकाणी योजनेबाबत जनजागृती करण्यात येणार असल्याचे महानगरपालिका आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी सांगितले.

उपमुख्य कार्यकारी अधिकारी जावेद शेख यांनी ग्रामस्तरीय समिती, तालुकास्तरीय पथकावर सोपविण्यात आलेल्या जबाबदारीची माहिती दिली. तसेच प्रत्येक तालुका स्तरावर बाल विकास अधिकारी हे योजनेसाठी समन्वयक म्हणून काम पाहतील, असे सांगितले.

## राशी भविष्य १३ जुलै २०२४

मेष : शुभ रंग :काळा,शुभ दिशा:पश्चिम

कौटुंबिक जीवन आनंददायी राहील. पूर्वी केलेल्या कामाचे परिणाम चांगले दिसून येण्यास सुरूवात होईल. बोलण्यावर नियंत्रण ठेवा.

वृषभ : शुभ रंग:निळा, शुभ दिशा: उत्तर

दुसऱ्याच्या भरोशावर राहून काम हाती घेऊ नका. कौटुंबिक समस्या निर्माण होतील. देण्या घेण्याच्या व्यवहारात सतता बाळका. व्यापार मध्यम राहील.

मिथुन:शुभ रंग:क़ाळा, शुभ दिशा: दक्षिण

लोकांशी संप वाढल्यामुळे आपली कामे पार पडतील. व्यापार व्यवसायात विस्तार होईल. दुसऱ्यावर रोष करू नका. कौटुंबिक स्थितीत सुधारणा होईल.

कर्क :शुभ रंग:निळा, शुभ दिशा:दक्षिण

देवावरील विश्वास व स्वत:च्या निर्णयाने हाती घेतलेल्या कामात वाढ होईल. नवीन उद्योग सुरू करण्यास चांगला दिवस. जबाबदाऱ्याच्या काम ापासून दूर रहा.

सिंह : शुभ रंग:पांढरा, शुभ दिशा:उत्तर

स्वत:ची योग्यता समजून घेतली तरच आपण समाजात प्रतिष्ठा संपादन करू शकाल. मुलांची प्रगती होईल. व्यापार चांगला चालेल. कायदेशीर प्रकरणी बेफीकरीपणा दाखवू नका.

कन्या : शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:पूर्व

जीवनात नवीन संधी निर्माण होईल. तणावमुक्त होऊन कार्य करा. व्यावसायिक स्पर्धेत यश मिळण्याचे योग आहेत. बेफीकीरीने कामे करून नका.

तुळ : शुभ रंग:पांढरा, शुभ दिशा:पश्चिम

हाती घेतलेले काम लक्ष देवून, मन लावून केल्यास त्यातून निश्चितच फळ मिळेल. सहकार्यांशी संबंध चांगले ठेवा. धंद्यात, नोकरीमध्ये आपले महत्त्व वाढेल.

वृश्चिक : शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा:पश्चिम

कामकाजामध्ये व व्यापारात विचारपूर्वक निर्णय घ्या. कौटुंबिक सहकाय कमी प्रमाणात मिळेल. आर्थिक बाबतीत समाधानी रहाल.

धनु: शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा :पूर्व

उपयोगी चर्चा घडून येईल. टाळत असलेले कामे पुर्ण होण्याचा योग आहे. व्यवस्यातील विस्ताराच्या दृष्टीने केलेल्या योजना यशस्वी होतील. मुलांची काळजी राहील.

मकर: शुभ रंग :पांढरा,शुभ दिशा:पश्चिम

आर्थिक बाबतीमधील प्रकरणे आज सुरळीत पार पडतील. विद्यार्थी वर्गासाठी आजचा दिवस शुभ आहे. काही घटनांमध्ये आपल्याला आज मन:स्ताप सहन करावा लागेल.

कुंभ : शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा: पश्चिम

जीवनात परिवर्तन घडवून येण्याची शक्यता. नवीन कामे हाती घेण्यास सध्याचा योग चांगला आहे. मात्र कोर्टकचेऱ्यांसाठी योग चांगला नाही. सहकाऱ्यांसोबत चांगले संबंध राहतील.

मीन : शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा:उत्तर

साहस पराक्रमात वाढ होईल. व्यापारात नवीन प्रस्ताव मिळतील. थंडीचे आजार जाणवतील. योग्य निर्णय घेण्याची मनस्थिती राहील. मित्रांची मदत मिळेल.

# आई वडिलांच्या पुण्याईमुळे कव्हेकरांच्या हातून राज्याची सेवा घडावी - रामायणाचार्य ह.भ.प.रामराव ढोक महाराज

लातूर : आज भाजपा नेते तथा माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांचा अभिष्टचिंतन सोहळा हा सोहळा म्हणजे दीर्घायुष्य मिळण्यासाठी ईश्वराकडे केलेली प्रार्थना होय. आजही तरूणांला लाजवेल असे काम त्यांच्या हातून होत आहे. जेएसपीएम संस्थेच्या माध्यमातून अनेक वंचितांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचे काम त्यांनी केलेले आहे. याबरोबच महाराष्ट्र नागरी सहकारी बँकेच्या माध्यमातून बचत गटाच्या १० हजार महिलांना विनातारण कर्ज देऊन महिलांना स्वावलंबी बनविण्याचे काम केलेले आहे. तसेच शेतकर्यांच्या प्रश्नासाठी पाठपुरावा करून ते प्रश्न मार्गी लावण्याचे काम करीत आहेत. आताही त्यांच्या हातून एवढे मोठे सत्कार्य होत आहे. ही खर्या अर्थाने आई वडिलांची पुण्याई आहे. त्यामुळे यापुढील कालावधीतही आई वडिलांच्या पुण्याईमुळे कव्हेकरांच्या हातून राज्याची सेवा घडावी असे प्रतिपादन रामायणाचार्य रामराव ढोक महाराज यांनी केले.

यावेळी ते शहरातील मार्केट यार्डातील दगडोजीराव देशमुख सभागृहात भाजपा नेते तथा किसान मोर्चा गोवा राज्याचे प्रभारी माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांच्या अभिष्टचिंनन सोहळ्यानिमित्त आयोजित कीर्तन सोहळ्यात बोलत होते. यावेळी कार्यक्रमाला दयानंद शिक्षण संस्थेचे सचिव रमेश बियाणी, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सौ.प्रतिभाताई शिवाजीराव पाटील कव्हेकर, भाजपा युवा नेते तथा भाजपा युवा मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष अजितसिंह पाटील कव्हेकर, जेएसपीएमचे समन्वयक संचालक निळकंठराव पवार, शैक्षणिक समन्वयक संभाजीराव पाटील, फायनांन्स डायरेक्टर बापूसाहेब गोरे, समन्वयक विनोद जाधव, प्राचार्य गोविंद शिंदे, प्राचार्य मारुती सूर्यवंशी, मुख्याध्यापक शिवाजी सूर्यवंशी, यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना रामराव ढोक महाराज म्हणाले, हा कीर्तन सोहळा एकदम भव्य–दिव्य नियोजनात्मक पध्दतीने केलेला आहे. एखाद्या श्रीमंत बापाने आपल्या लाडक्या मुलीचा लग्ण सोहळा करावा असाहा अभिष्टचिंतन सोहळा होत आहे. या कार्यक्रमासाठी कुठलीही तडजोड केलेली नाही. अत्यंत छान नियोजन त्यांच्यावर प्रेम करणार्या कार्यकर्ते व पदाधिकार्यांची मोठी गर्दी दिसून येत आहे. कव्हेकर साहेबांच्या जडणघडणीमध्ये आई वडिलांचे योगदान मोलाचे आहे. शुध्द बिजा पोटी फळे रसाळ गोमटी या उक्तीप्रमाणे त्यांची ही वाटचाल झालेली आहे. आई वडिलांच्या आदर्शात्मक संस्कारावरच कव्हेकर साहेबांची यशस्वी वाटचाल सुरू आहे. आपल्या अध्यात्माच्या माध्यमातून भगवंताला न विसरणे यातून हित साध्य होते. अध्यात्मामध्ये आपण जीवनामध्ये कसे जगावे याचा वस्तूपाठ गितेमधून सांगण्यात आलेला आहे. मृत्यूचे सार भागवतामध्ये मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यामुळे सदैव आनंद जीवन जगण्यासाठी परमेश्वराचे चिंतन करा. असे आवाहनही त्यांनी यावेळी बोलताना केले.

अध्यात्मिक विचारातून आदर्श समाज घडविण्याचे काम करू

– माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर

रामायणाचार्य रामराव ढोक महाराज हे आपल्या आध्यात्मिक, सत्शील, सदाचारी विचारातून पवित्र असा समाज निर्माण करण्याचे काम करीत आहेत. ही आपल्या सर्वांच्या दृष्टिने आनंदाची बाब आहे. आपणही सामाजिक, राजकीय, आध्यात्मिक, सहकार क्षेत्रात गेल्या चाळीस वर्षापासून काम करीत आहोत. मार्केट कमिटचा सभापती असताना गौरीशंकर मंदिर उभारण्याचे काम केले. आता मजगे नगर येथे मराठवाड्यातील भव्य–दिव्य असे विठ्ठल–रुक्मिनीचे मंदिर उभारण्याचे काम सुरू आहे. त्याचे निमंत्रणही आपणांस देऊ असे म्हणत आयुष्यामध्ये कार्य करीत असताना साधूसंताच्या विचारातून मला प्रेरणा मिळते. मी दररोज भगवान शंकराची पूजा करतो. तसेच अनेक महात्म्यांचे विचार आत्मसात करून त्याच विचारातून वाटचाल करतो. चांगला समाज घडवायचा असेल तर अध्यात्माशिवाय पर्याय नाही. त्यामुळे यापुढील कालावधीतही आध्यात्मिक विचारातून आदर्श समाज घडविण्याचे काम आपण करू असे प्रतिपादन भाजपा नेते तथा किसान मोर्चा गोवा राज्याचे प्रभारी माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी केले.

## लातूर हरितोत्सव-२०२४ या उपक्रमानिमीत्त रविवारी लातूर शहरातील वाहतूक मार्गात बदल..

लातूर/प्रतिनिधी :जिल्हाधिकारी, लातूर यांच्या संकल्पनेतून लातूर जिल्हयातील हरीत क्षेत्र वाढविण्याचे दृष्टीने व दिनांक ०१ जुलै ते ०७ जुलै रेजी होणाया कृषि सप्ताह व वन महोत्सव २०२४ याचे औचित्य साधून लातूर हरितोत्सव–२०२४ हा उपक्रम वृक्ष लागवडीसाठी राबविण्यात येणार आहे. यासाठी लातूर शहरात दिनांक १४/०७/२०२४ रोजी हनुमान चौक ते गंजगोलाई परिसरात रस्त्याचे दुतर्फा रोप वाटीकेचे प्रदर्शन स्टॉल व विक्री विविध बचत गट यांचेकडून खाद्य पदार्थांची विक्री या भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

सदर कार्यक्रम व प्रदर्शनाच्या ठिकाणी – हनुमान चौक ते गंजगोलाई परिसरात जिल्हयातून मोठ्या संख्येने जनसमुदाय येण्याची शक्यता आहे. त्या वेळी रस्त्यावर दुतर्फा गर्दी होणार असल्याने रस्ता तीन चाकी व चारचाकी वाहनाना बंद करून दि. १४/०७/२०२४ रोजी सदर भागातील वाहतुक विविध भागात वळविण्यात येत आहे.

अ) लातूर हरितोत्सव–२०२४ उपक्रम दिनानिमित्त दिनांक १४/०७/२०२४ रोजी सकाळी ८.०० ते १७.०० वाजेपर्यंत हनुमान चौक ते गंजगोलाई परिसर हा मुख्य रोड तीन चाकी, चारचाकी व सर्व प्रकारच्या मोठ्या वाहनांना (मोटरसायकल वगळून) वाहतुकीसाठी बंद करण्यात येत आहे.

तरी जनतेने खालील पर्यायी मार्गाचा अवलंब करावा.

१) महात्मा गांधी चौकातुन गंजगोलाई कडे जाणारी तीन चाकी, चारचाकी व सर्व प्रकारच्या मोठ्या वाहने हे हनुमान चौकातून गुळमार्केट, नांदेड रोड, शिवाजी रोड मार्गे गंजगोलाईकडे जातील किंवा हनुमान चौकातून सुभाष चौक–भुसार लाईन अथवा हत्ते कॉर्नर, मस्जिद रोड मार्गे गंजगोलाईकडे जातील.

२) गंजगोलाई पसिरातून हनुमान चौकाकडे येण्यासाठी सदरचा मार्ग एकेरी वाहतुकीचा मार्ग पुर्वीपासून निश्रि्चत असल्याने सदर मार्गावर उलट वाहतुक होत नाही.

तरी सर्व नागरिकांनी दि. १४/०७/२०२४ रोजी सकाळी ०८.०० ते १७.०० वाजेपर्यंत वाहतुकीसाठी बंद असलेल्या मार्गावर वाहनांचा वापर टाळावा व पर्यायी मार्गाचा वापर करुन प्रशासनास सहकार्य करावे.

## इतिहासात आजचा दिवस १३ जुलै

अंतरराष्ट्रीय

१७९४ – व्हॉस्गेसची लढाई.

१८३२ – हेन्री रोव स्कूलक्राफ्टने मिसिसिपी नदीचे उगमस्थान शोधले.

१८६३ – सक्तीच्या सैन्यभरतीविरुद्ध न्यूयॉर्क शहरात दंगल.

१८७८ – १८७८चा बर्लिनचा तह – सर्बिया, मॉंटेनिग्रो व रोमेनिया ओट्टोमन साम्राज्यातून वेगळे झाले.

१९०८ – ऑलिंपिक स्पर्धांमध्ये स्त्रीयांना भाग घेण्यास परवानगी.

१९०९ – कॅनडातील कोक्रेन, ऑन्टारियो शहराजवळ जमिनीत सोने सापडले.

१९४१ – दुसरे महायुद्ध – मॉंटेनिग्रोत जर्मन वा इटालियन राजवटीविरुद्ध उठाव.

१९७७ – न्यूयॉर्कमधील वीजपुरवठा २५ तास खंडित. अंधारपटात लुटालुट, मारामारी व गुंडगिरीचा सुकाळ.

१९८३ – श्रीलंकेत वांशिक हत्याकांड. ३,००० तामीळ व्यक्तींची हत्या. ४,००,००० हून अधिक तामीळ व्यक्तींचे युरोप व कॅनडा व भारतात पलायन.

२००५ – पाकिस्तानच्या घोटकी रेल्वे स्थानकात तीन रेल्वे गाड्या एकमेकांवर आदळल्या. १५० ठार.

२००६ – इस्राईलने बैरुत विमानतळावर हल्ला चढवला.

२००६ – गाजा पट्टीवर इस्त्राइली विमानांच्या बॉम्बहल्ल्यात २३ पॅलेस्टीनी ठार झाले.

२००७ – पाकिस्तानमधील लाल मशीदीत कट्टरवाद्यांना संपवण्यासाठी करण्यात आलेल्या लष्करी कारवाईत १०२ जण ठार झाले.

राष्ट्रीय

१६६० – शिवाजी महाराजांची सहीसलामत सुटका करण्यासाठी घोडखिंड लढविणारे शूरवीर बाजीप्रभू देशपांडे यांचे प्राणार्पण.

१९१२ – मौलाना अबुल कलाम आझादनी अल हिलाल या उर्दू भाषेतील नियतकालिकाचे प्रकाशन सुरू केले.

२००७ – प्रसिद्ध गीतकार समीर यांना काशी गौरव पुरस्कार मिळाला.

जन्म

१५९० – पोप क्लेमेंट दहावा.

१६०८ – फर्डिनांड तिसरा, पवित्र रोमन स्म्राट.

१८०८ – पॅट्रिस मॅकमहोन, फ्रांसचा राष्ट्राध्यक्ष.

१८९३ – प्रसिद्ध गायिका केसरबाई केरकर.

१९४० – पॅट्रिक स्टुअर्ट, इंग्लिश अभिनेता.

१९४२ – हॅरिसन फोर्ड, अमेरिकन अभिनेता.

१९४५ – ऍशली मॅलेट, ऑस्ट्रेलियन क्रिकेट खेळाडू.

१९५३ – लॅरी गोम्स, वेस्ट इंडीझचा क्रिकेट खेळाडू.

१९५४ – रे ब्राइट, ऑस्ट्रेलियन क्रिकेट खेळाडू.

१९६४ – उत्पल चटर्जी, भारतीय क्रिकेट खेळाडू.

निधन

९३९ – पोप लिओ सातवा.

१७६१ – तोकुगावा लेशिगे, जपानी शोगन.

१७९३ – ज्यॉं पॉल मरात, फ्रेंच क्रांतीकारी.

१९८० – सेरेत्से खामा, बोत्स्वानाचा पहिला राष्ट्राध्यक्ष.

१९९० – क्रिकेट सामन्याचे अतिशय सुदंर धावते वर्णन करणारे प्रसिद्ध क्रीडा–समीक्षक बॉबी तल्यारखान.

## एक दिवस पर्यावरणासाठी, वृक्ष लागवडीसाठी.. 'लातूर हरितोत्सव'मध्ये सहभागी होवूया, पर्यावरण संवर्धनासाठी योगदान देवूया !

लातूर, (जिमाका) : जिल्ह्यातील हरित क्षेत्र वाढविण्यासाठी जिल्हा प्रशासनाच्यावतीन 'माझं लातूर, हरित लातूर' अभियान राबविण्यात येत आहे. या अंतर्गत रविवार, १४ जुलै २०२४ रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ५ दरम्यान 'लातूर हरितोत्सव–२०२४' या अभिनव उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. गंजगोलाई परिसरात होणाऱ्या या उपक्रमात एकाच ठिकाणी विविध प्रजातीच्या वृक्षांची रोपे सवलतीच्या दरात उपलब्ध करून देण्यासोबतच वृक्ष लागवड, वृक्ष संवर्धन याबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. या उपक्रमात खासगी रोपवाटिकांचे स्टॉल लावण्यात येणार असून यासाठी २८ पेक्षा अधिक खासगी रोपवाटिकांनी नोंदणी केली आहे. यासोबतच शासकीय रोपवाटिकांचे स्टॉलही याठिकाणी राहणार आहेत.

या उपक्रमामुळे औषधी वनस्पती, शोभेची झाडे, परसबागेमध्ये लावण्यायोग्य झाडे, फळझाडे व फुलझाडांची रोपे, वृक्षारोपणासाठी आवश्यक सेंद्रिय खते, कुंड्या व इतर आवश्यक साहित्य सवलतीच्या दरात एकाच ठिकाणी उपलब्ध होणार आहे. लातूर जिल्ह्यात हरित क्षेत्राचे प्रमाण अतिशय कमी असल्याने जिल्ह्यात वृक्ष लागवड मोहीम राबविण्यात येत आहे. यामध्ये लोकांचा सहभाग वाढवून ग्रामीण, तसेच शहरी भागातही मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करण्याचा जिल्हा प्रशासनाचा प्रयत्न आहे. या अनुषंगाने जनजागृती करण्यासाठी १४ जुलै रोजी सकाळी ८ वाजता महात्मा गांधी चौक ते गंजगोलाई दरम्यान वृक्षदिंडीचे आयोजन करण्यात आले आहे.

'लातूर हरितोत्सव २०२४' या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे यांच्या संकल्पनेतून आयोजित उपक्रमाच्या माध्यमातून लातूरकरांना विविध वृक्षांची माहिती देण्यासोबतच त्यांना एकाच ठिकाणी विविध प्रकारची रोपे सवलतीच्या दरात उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. त्यामुळे नागरिकांनी या उपक्रमात सहभागी होवून आपल्या लातूर जिल्ह्यातील हरित क्षेत्र वाढविण्यासाठी योगदान देण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

मिलेटस फूड स्टॉलवर चाखायला मिळणार विविध पदार्थांची चव

पौष्टिक तृणधान्य अर्थात मिलेटस हे आरोग्यासाठी अतिशय उपयुक्त असून जिल्ह्यात मिलेटस लागवडीला प्रोत्साहन देण्यात येत आहे. या खाद्यपदार्थांचे फायदे लोकांना समजावेत आणि मिलेटसपासून बनणाऱ्या पदार्थांची चव चाखता यावी, यासाठी 'लातूर हरितोत्सव २०२४' उपक्रमात मिलेटसपासून तयार करण्यात येणाऱ्या विविध पदार्थांचे स्टॉल महिला बचतगटांच्या माध्यमातून उभारण्यात येणार आहेत.

## ज्याचे (दात) दुखते त्यालाच कळते! 'या' घरगुती उपायांनी करा दुखण्याला बाय-बाय

दाताचे दुखणे वाढायला लागले की खूप वेदना सहन कराव्या लागतात. कधी कधी तर हे दुखणं खूपच असह्य होऊन जाते. वेदना इतक्या वाढत जातात की काही खाणं ही कठीण होऊन बसते. दातदुखीची वेगवेगळी कारणे असू शकतात. मात्र, आम्ही तुम्हाला आज दातदुखीवर रामबाण उपाय सांगणार आहोत. आपल्या किचनमध्ये असलेल्या पदार्थांमुळं तुम्ही दाताच्या वेदनेवर मात करु शकतात.

मौखिक आरोग्य सांभाळणे हे आजच्या जगात महत्त्वाचे आहे. रोज दोन वेळा ब्रश करणे इतक्यापर्यंत न राहता मौखिक आरोग्य सांभाळण्यासाठी आपण्या खाण्या–पिण्यावरदेखील नियंत्रण ठेवणे गरजेचे असते. दातादुखीबद्दल बोलायचे झाल्यास वेगवेगळ्या कारणांमुशं दातात वेदना होऊ शकतात. दात नीट साफ न करणे, गोड अतिप्रमाणात खाणे, प्रोसेस्ड फूड खाणे, कॅल्शियमची कमी, ब्रश करताना जीभेची स्वच्छता न करणे, कारण जीभेवर बॅक्टेरिया जमा होऊ लागले की हिरड्या व दातांचेही नुकसान होते. या व्यतिरिक्त बॅक्टेरिअल इन्फेक्शन किंवा दातांना किड लागणे यामुळंही दातांमध्ये वेदना निर्माण होऊ शकते.

दाताच्या वेदनेपासून आराम कसा मिळवाल?

पेपरमिंट टी बॅग

दातदुखी सुरू झाल्यास तुम्ही पेपरमिंट टी बॅग फ्रीजमध्ये काही वेळासाठी थंड होण्यासाठी ठेवून द्या. त्यानंतर जिथे वेदना होत आहेत त्या जागी टी बॅग ठेवा. जर दुखणे सहन करण्यापलीकडे गेले असेल तर तुम्ही गरम टी बॅगदेखील ठेवू शकता. पेपरमिंट वेदना निर्माण करणाऱ्या बॅक्टेरियांपासून लढण्यास मदत करते आणि वेदनेपासून आराम देते.

लवंग–दातदुखीपासून आराम मिळवण्यासाठी लवंग हे खूप प्रभावी आहे. यासाठी ५ ते ६ लवंग घेऊन त्याची पावडर तयार करा. यानंतर लवंगाची पावडर ऑलिव्ह ऑइलमध्ये मिसळून ती पेस्ट जिथे दातदुखी आहे तिथे लावावी. यामुळं काहीच वेळात दुखण्यापासून आराम मिळतो.

लसूण–जेवणाची रंगत वाढवणारा लसूण दातदुखीवर आराम मिळवण्यासाठी फायदेशीर आहे. तुम्ही लसणाचा चहा बनवून पिऊ शकता किंवा लसणाच्या पाकळ्या चावून खाल्ल्यासही आराम मिळेल. जिथे वेदना होत आहेत त्या जागी लसणाची पेस्ट टावू शकता. लसणात असलेले अँटी बॅक्टेरिअल गुण दातातील बॅक्टेरियापासून लढण्यास मदत करतात. त्यामुळं दाताच्या वेदनेपासून सुटका मिळतेय.

लिंबू–दाताच्या वेदनेपासून आराम मिळवण्यासाठी लिंबाला मीठ लावून ते चावून खा त्यानंतर कोमट पाण्याने गुळण्या करा. असं केल्याने दातदुखीवर आराम मिळतो.

व्हीटग्रास–व्हिटग्रासमध्ये वेदना कमी करणारे गुणधर्म आहेत. अशावेळी जिथे दातदुखी होत आहे त्या भागावर व्हिटग्रासची पेस्ट लावल्याने आराम मिळतो.

## नगरपरिषद, नगरपंचायतीमधील रिक्तपदांच्या पोटनिवडणुकीसाठी ११ ऑगस्टला मतदान

मुंबई, : विविध नगरपंचायती व एका नगरपरिषदेतील एकूण ११ सदस्य पदांच्या रिक्त जागांसाठी आणि हातकणंगले (जि. कोल्हापूर) नगरपंचायतीच्या थेट अध्यक्षपदाच्या रिक्त जागेच्या पोटनिवडणुकीसाठी ११ ऑगस्ट २०२४ रोजी मतदान होणार आहे, असे राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केले आहे.

खालापूर, पाली (जि. रायगड), निफाड, सुरगाणा (जि. नाशिक), बोदवड (जि. जळगाव), धडगाव–वडफळ्या–रोषमाळ बु. (जि. नंदुरबार), कवठेमहांकाळ, खानापूर (जि. सांगली), चंदगड (जि. कोल्हापूर) आणि बाभूळगाव (जि. यवतमाळ) या नगरपंचायतींच्या सदस्यपदांच्या प्रत्येकी एका रिक्त जागेसाठी मतदान होईल. त्याचबरोबर कन्हान–पिपरी (जि. नागपूर) नगरपरिषदेच्या सदस्यपदाच्या एका रिक्त जागेसाठी देखील मतदान होणार आहे.

नामनिर्देशनपत्रे १८ ते २४ जुलै २०२४ या कालावधीत स्वीकारली जातील. रविवारी सुटीच्या दिवशी नामनिर्देशनपत्र स्वीकारण्यात येणार नाहीत. २५ जुलै २०२४ रोजी नामनिर्देशनपत्रांची छाननी होईल. ११ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत मतदान होईल. १२ ऑगस्ट २०२४ रोजी मतमोजणी होईल, असेही राज्य निवडणूक आयोगाच्या प्रसिद्धिपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

हे पत्रक, मालक, संपादक, प्रकाशक रघुनाथ बनसोडे यांनी मुद्रक महेश मोतीराम राठोड यांनी मयूर ऑफसेट प्रिंटर्स, मेन रोड, मित्र नगर, लातूर, जि.लातूर - ४१३ ५१२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक लातूर प्रभात, पवन कॉलनी, कृपासदन शाळेजवळ, लातूर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
संपादक - रघुनाथ वाघोजी बनसोडे, मो.८८३०२५०६४५
(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकाची जबाबदारी)
RNI No.: - MAHMAR/2017/72894